# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 22/1/2015 (का.प.क्र.09) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक 22 जानेवारी 2015 रोजी (का.प.क्र .09 ) मा.सभापती श्री.विजय वाघचौरे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12.45 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार,नगरसचिव, श्री.एम.ए.पठाण व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
02. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
03. स.स.श्री.त्र्यबंक गणपतराव तुपे
04. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
05. स.स.श्री.अनिल श्रीकिशन मकरीये
06. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी
07. स.स.श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली
08. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
09. स.स.श्री.संजय सांडु चौधरी
10. स.स.श्री.जहांगीर खान अब्बास खान
11. स.स.सौ.प्रिती संतोष तोतला
12. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा

चर्चा :

श्री.काशिनाथ कोकाटे : मनपाचे सेवानिवृत्त प्रकल्प संचालक विजय जावरे यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :यास माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती :ठिक आहे सर्वानी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी स्व.विजय जावरे यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.त्र्यंबक तुपे :मागिल बैठकीत प्रभाग निहाय वसुली संदर्भात आढावा घेतला विकास कामासाठी उत्पन्न यावे.त्यावेळी कमी उत्पन्न येत असल्याचे निदर्शनास आले.आजची परीस्थिती काय, उत्पन्नवाढीसाठी काय उपाययोजना केल्या.कराच्या संदर्भात वादग्रस्त प्रकरण आहे काही न्यायालयात प्रकरणे आहे अशांना प्रत्यक्ष बोलवून चर्चा करून त्यांचेकडून कर भरणा करून घेतला काय? झोपडपट्टी,दलीत वसाहतीत व गुंठेवारी भागात स्पेक कंपनीने लावलेला टॅक्स नुसार नागरीकांना बीले देण्यात आली. वार्ड 57 मध्ये रोहिदासपुरा स्लम वसाहत तेथील 40-50 लोकांना 50 हजार पर्यत टॅक्स लावला असे होत असेल तर कुणीही टॅक्स भरणार नाही.तेथे चर्मकार बांधव राहतात.पुर्वी टॅक्स किती व आता किती लावतो आहे विचार केला नाही.त्या नागरीकाचे म्हणणे ऐकूण घेत नाही 3-3 वर्षापासून वार्ड कार्यालयात ते नागरीक चकरा मारतात.श्रीमती हिराबाई चंपालाल उणे यांना जुना टॅक्स 400-500 त्यांना 40 हजार टॅक्स आकारला.त्यांनी तक्रार दिली चर्चा केली पुढे कार्यवाही केली नाही

त्यामूळे मा.न्यायालयात त्यांनी प्रकरण दाखल केले न्याय मिळावा म्हणून मागणी केली.मा.न्यायालयाच्या मार्फत प्रत त्यांनी शासन व संबधीत मंत्रीमहोदय यांना दिली महापालिकेला प्रत आली असेल.अशा प्रकरणात सुनावणी घेवून तडजोड करून योग्य कार्यवाही करायला पाहिजे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :जवाहर कॉलनी गारखेडा पुर्ण लिगल भाग, येथील मालमत्ता धारकांनाही जास्त रक्कमेच्या कराच्या नोटीसा दिल्या ते कर भरण्यास तयार नाही.ज्यांना जास्तीचा कर लागला त्यांचे तक्रारीची दखल घेवून तडजोड करून त्याचे म्हणणे ऐकूण निपटारा करावा नक्कीच वसुलीत वाढ होईल.

श्री.अनिल जैस्वाल :अनेक नागरीक टॅक्स भरण्यासाठी वार्ड मध्ये जातात परतुं त्यांना आवश्यक माहिती दिली जात नाही.कर भरणा करण्यासाठी वार्ड कार्यालयात येणारे नागरीकांच्या अडीअडचणी सोडवाव्या वसुलीत वाढ होईल.

श्री.मीर हिदायत अली : नवीन मालमत्ता न शोधता जुन्या मालमत्तांना जे 15-20 वर्षापासून टॅक्स भरणा करीत आहे त्यांना वाढीव टॅक्सच्या नोटीसा दिल्या त्यामुळे वाद्ग्रस्त प्रकरण होते व थकबाकी वाढत जाते.अशा तक्रारीची वार्डवाईज सुनावणी घेवून प्रकरणे निकाली काढावी. शहराच्या सिमेवर ,पडेगाव ,रेल्वेपटरीच्या बाहेरील भाग, हर्सुल , चिकलठाणा अशा भागात नवीन वसाहती झालेल्या आहे होत आहे. 15-20 दिवसात अशा भागाचा सर्वे करून नवीन मालमत्तांचा शोध घ्यावा त्यांना नव्याने टॅक्स लावावा जे मालमत्ता कराबाबत प्रकरण वादग्रस्त असतील त्यांचेशृी चर्चा करून तडजोड करून प्रकरणी निकाली काढण्याचे असे आदेशीत करावे.

श्री.सुरेद्रं कुलकर्णी :अनेक नागरीकांना महापालिकेच्या कार्यालयात कामासाठी चकरा माराव्या लागतात त्यांच्या तक्रारीची दखल घेण्याचे आदेशीत करावे.

श्रीमती प्रिती तोतला :वार्ड ड कार्यालयातील तीन कर्मचारी इतरत्र बदलीवर दिले श्री.भोजने नावाचे कर्मचारी यांचेकडे जन्ममृत्यू प्रमाणपत्र व वसुलीचे ही काम दिले. तेथे कर्मचारी वाढवून देण्यात यावे. कर भरून घेण्यास कर्मचारी नाही नागरीक कर भरण्यास तयार आहे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

कर निर्धा.व संकलक:डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंन्टर येथे वसुलीच्या संदर्भात मा.आयुक्त यांनी बै्ठक घेतली त्यात उपआयुक्त स्तरावरील अधिकारी यांना 1 लक्षच्या वरील तर कार्यकारी अभियंता रू 50 हजार ते 1 लक्ष पर्यंतचे तसेच 10 हजार ते 50 हजार कर असलेल्या मालमत्ताचे कर वसुली,वार्ड अधिकारी , 10 हजार पर्यतचा असलेला कर वसुलीचे, वार्ड अभियंता यांचेकडे आहे व वरील सर्व प्रकारच्या रक्कमेचा कर वसुलीसाठी सहकार्य करण्याचे आदेशीत केले आहे.यापुर्वी विशेष कक्ष स्थापन होता तेथे नागरीक येत असे तेंव्हा वार्ड अधिकारी यांना माहित होत नसे त्यामूळे वार्ड अधिकारी यांना आता नावात दुरूस्ती मागील थकबाकी या वर्षामध्ये ॲड करणे असे किरकोळ दुरूस्तीचे अधिकार दिले. नवीन प्रॉपर्टीचा शोध घेणे चालू आहे फौजी धाबा मालक यांना 4500रू टॅक्स होता तो अडीच लक्ष केला 6 वर्षाचा टॅक्स 12.64 लक्ष होतो सिल लावण्याची कार्यवाही केली त्यांचे कडून रूपये 3 लक्ष वसुल केले.उर्वरीत टॅक्स भरण्यास ते तयार आहे.आज कृषी उत्पन्न बाजार समितीवर कार्यवाही केली 20-25 लोकांनी टॅक्स भरणा केला त्यांचेकडे 6.29 कोटी थकबाकी आहे.2006 पासून टॅक्स आकारला 74 लक्ष प्रत्येक वर्षी कर होत होता. सन 1998 पासून कर

आकारावा मागणी होती तेंव्हा पासून जवळपास 37 लक्ष टॅक्स लावला. जवळपास 45 लक्ष वसुल केले आणखी 6.28 कोटी बाकी आहे वसुलीची कार्यवाही करीत आहोत. स.सदस्य श्री.त्र्यंबक तुपे यांनी म्हटल्या प्रमाणे त्या भागात 100 ऐवजी काहीना 200 रू टॅक्स आकारला गेला तेथील कर निरीक्षक यांना चौकशी करून तपासणी करण्याचे आदेशीत केले तीन दिवसात कार्यवाही केली जाईल.

श्री.त्र्यंबक तुपे :फौजी धाबास 4500 रूपयचे टॅक्स कसा आकारला जात असे.अनेक वर्षापासून हा धाबा आहे.उशीरा कसे लक्षात आले शहरात अनेक हॉटेल्स दुकाने आहे पुर्ण व्यावसायिकांची यादी तयार करावी व वसुली करावे.99 वार्डचे 113 वार्ड होणार शहर मोठे होत आहे. हॉटेल , धाबा , दवाखाने अनेक व्यावसायिक आहे. नवीन कमर्शियल मालमत्ताचा शोधण्यासाठी विशेष वसुली अधिकारी नेमावे वसुली वाढवावी.

कर निर्धारक व संकलककमर्शिलय टॅक्स वसुली करीत आहोत केंद्र शासनाचे विमान वाहतूक प्राधिकरण यांनी 50 टक्के टॅक्स भरण्याची तयारी दर्शविली.रेल्वे विभाग, वन विभाग असेल टॅक्स भरण्यास तयार नव्हते आता त्यांनी सुध्दा तयारी दर्शविली आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :रोहीदासनगर भवानीनगर भागातील वादग्रस्त प्रकरणात सुनावणी घेवून कार्यवाही करावी.

श्री.मीर हिदायत अली :आसाराम बापू आश्रमला लावलेला टॅक्स वसुल केला नाही.प्रोझोन मॉलला किती टॅक्स आकारला जातो आतापर्यंत किती वसुली केली.

कर निर्धारक व संकलक:प्रोझोन मॉलने रस्त्यावर 5.73 कोटी खर्च केले 6.50 ते 6.75 कोटी कराची थकबाकी आहे.70-75 लक्ष या वर्षी निश्चित मिळतील.न भरल्यास सील लावण्याची कार्यवाही केली जाईल.

मा.सभापती :गरीबाच्या मालमत्तेला सील केले जाते मोठमोठया मिळकतीचा मालमत्ता वसुली करण्याची कार्यवाही करावी.

कर निर्धारक व संकलक:मोठया मालमत्ताधारकडूनच वसुली करीत आहोत तेथे सील केले जाते. फौजी धाबा मालकाकडून वसुली संदर्भात कार्यवाही केली.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :श्री.झनझन हे अधिकारी सक्षमपणे काम करतात परंतु.अनेक मिळकतीचे अनेक वर्षापासूनचे टॅक्स वसुल केले जात नाही गरीब नागरीकांना वसुलीसाठी धारेवर धरले जाते.

कर निर्धारक व संकलक:प्रोझोन मॉलचे 48 तासात पैसे जमा होतील न केल्यास सील करणार आहोत.आसाराम बापू आश्रमचे ॲसीसमेंन्ट झाले.पुजा करतात तो भाग सोडून बाकीच्या कमर्शियल भागास टॅक्स लावणार आहोत.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :लिगल जो भाग आहे त्यास टॅक्स नियमाप्रमाणे लावावा ते भरण्यास तयार आहे.

श्री.संजय चौधरी :चिकलठाणा विमानतळा शेजारी एका पेट्रोल पंप चालक दीड एकर जागेचा कमर्शिलय वापर करतात त्यास 14 हजार टॅक्स आहे.हा प्रश्न अनेकदा उपस्थित केला कार्यवाही केली नाही या भागात तसेच अनेक धाबे आहे ज्यांची एक एक गुंठाच जागा असतांना त्यांना 70-80 हजार टॅक्स जुन्या शहरातच टॅक्स वाढविण्या पेक्षा शहराचा आऊटर भाग जसे चिकलठाणा भागात जवळपास 1 हजार नवीन मालमत्ता तेथे एक कर्मचारी स्पेशल नियुक्त केले तर त्या मिळकतीस टॅक्स लावून घ्यावा वसुलीत वाढ होईल.अनेक नागरीक टॅक्स लावून घेण्यास व भरण्यास तयार आहे सुविधा न देता त्या भागात जास्त टॅक्स लावू नये. यापुर्वी मी स्वत:मध्यस्ती करून 40-42

मालमत्तेस टॅक्स लावून देण्यास मदत केली. रितसर टॅक्स लावावा जनता भरण्यास तयार आहे.वसुली झाली तर विकास कामे करण्यास मदत होईल.

श्री.जहागीर खान :जाधववाडी भाजी मंडई येथे सुविधा देवू असे आश्वासन दिले होते मा.आयुक्तांनी बैठक घेतली होती. टॅक्स आकारतांना साफसफाई कर घेतो परंतु तेथे साफसफाई , पाण्याची सुविधा नाही. रस्ते व्यवस्थित नाही मोकाट जनावरे फिरतात कोणतीही सुविधा नसतांना दीड कोटी टॅक्स वसुल करतो.दुकान मालकास विश्वासात न घेता वसुलीसाठी पोलीसांना सोबत घेवून महापालिकेचे अधिकारी जातात दुकानाचे शटर्स सील करतात हे बरोबर नाही.

कर निर्धारक व संकलकः तत्कालीन मा.आयुक्त कांबळे साहेब यांनी तेथील व्यापारी यांचे समवेत बैठक घेतली त्यांचे म्हणणे होते की 2006 ऐवजी 1998 पासून गाळे ताब्यात मिळाले तेंव्हाचा कर लावावा.सन 2006 चा टॅक्स लावल्यामूळे 76 लक्ष प्रत्येक वर्षाचा कर होतो तो 1998 चा टॅक्स लावल्यामूळे तेंव्हाच्या टॅक्सनुसार 37 लक्ष वार्षीक टॅक्स होतो.सामान्य करात माफी देण्याचे काहीही नव्हते परंतु सन 1998 ते 2006 पर्यंत दंडाची रक्कम जर त्या व्यापा-यानी 100 टक्के भरणा केली तर त्यांना ती माफी दयायची असे निवेदन करणार आहोत.सध्या 6.25 कोटी थकबाकी आहे. तेथील रस्ते हस्तांतर न केल्यामूळे सुविधा देता येत नाही असे नगररचना विभागाचा अभिप्राय आहे.

श्री.जहागीर खान :भाजीमंडई व्यापा-याकडे थकबाकी नाही धान्याचे व्यापारी यांचेकडे 6.25 कोटी बाकी आहे. 25 भाजी मंडईच्या दुकानांना दुप्पट टॅक्स का लावण्यात आला.

कर निर्धारक व संकलकः काहीनी परवानगी घेवून दुकाने बांधली होती ज्यांनी खाजगी मध्ये दुकाने केली त्यांना दुप्पट टॅक्स लावला तेथील कचरा उचलण्याचे काम होत आहे.

श्री.जहागीर खान : पाण्याची व्यवस्था नाही साफसफाई होत नाही, रस्ते नाही हया सुविधा देण्याची जबाबदारी प्रशासनाची नाही का सुविधा दयाव्यात तर व्यापारी टॅक्स देतील.

श्री.मीर हिदायत अलीः सर्व आवश्यक सुविधा तेथे देण्यात याव्यात तरच टॅक्स कसा वसुल करावा,नियमात काय आहे.

शहर अभियंता : नियमानुसार टॅक्स भरणे आवश्यक आहे.ते क्षेत्र इन्टरनल कॉम्प्लेक्स आहे त्यांनी स्वतः विकसीत केले उदा. श्री. धुत यांचा 25 एकरचा बंगला आहे त्या पुर्ण जागेचा ते टॅक्स भरतात.तेथे गेट पर्यत साफसफाई महापालिका करू शकेल,आतील नाही.त्याच धरतीवर कृषी उत्पन्न बाजार समितीने स्वतः रस्ते, ड्रेनेज, व इतर सर्व तयार केले .हे सर्व बाजार समितीने करावे. तेथ्रील कचरा आपण उचलतो.पे ॲण्ड युज या धरतीवर सुलभ शौचालय करून देण्याचे आश्वासन दिले त्याचा वापर तेथे येणारे शेतकरी व सर्वांना होऊ शकेल.तो भाग हस्तांतर करण्याचा प्रश्न येत नाही.

कर निर्धारक व संकलकः महापालिका हद्दीत असल्यामूळे टॅक्स भरणे आवश्यक आहे.

श्री.जहागीर खान :दीड कोटी रक्कम भरणा केले तर सुविधा देण्याची जबाबदारी येत नाही का ?महाराष्ट्रातून शेतकरी व लोक येतात पाणी, रस्ते, इतर सर्व आवश्यक सुविधा देण्यात याव्यात.

शहर अभियंता :मार्केट कमेटी शुल्क वसुली करते त्यांनी सुविधा दयाव्यात.फक्त महापालिको कचरा उचण्याचे काम करेल.

श्री.त्र्यंबक तुपे :या संदर्भात मार्केट कमेटीचे अधिकारी व प्रशासन यांनी एकत्रित बैठक घेवून तेथे काय सुविधा देता येईल त्या बाबत आदेशीत करावे.तसेच प्रभाग समिती अ ते फ नुसार वसुलीची माहिती घ्यावी.

कर निर्धारक व संकलकः वार्ड अ चे 19.23 कोटी टारगेट होते,वसुली 4.63 कोटी झाली. गेल्या वर्षीपेक्षा 66 लक्ष जास्त वसुली, वार्ड ब चे टारगेट 32 कोटी,वसुली 8.84 कोटी झाली.गेल्या वर्षी पेक्षा 19 लक्ष जास्त वसुली केली.वार्ड क चे टारेगट 13.78 कोटी होते वसुली 2.57 कोटी केले गेल्या वर्षी पेक्षा 95 लक्ष जास्त वसुली झाली.वार्ड ड चे टारगेट 21 कोटी वसुली 8.09 कोटी गेल्या वर्षीपेक्षा 87 लक्ष कमी वसुल झाले. वार्ड ई चे टारगेट 18.56 कोटी वसुली 5.14 कोटी , गेल्या वर्षी पेक्षा 34 लक्ष जास्त वसुल झ ाले. वार्ड फ चे टारगेट 29.72 कोटी,वसुली 13.38 कोटी मागिल वर्षीच्या तुलनेत 04.55 लक्ष जास्त वसुली अशी एकूण मागील वर्षी पेक्षा 4.28 कोटी जास्त वसुली झाली 32 टक्के वसुली झालेली आहे.

श्री.त्र्यंबक तुपे : दोन महिणे शिल्लक किती वसुली होणार यात नवीन मालमत्ताची संख्या किती आहे.

कर निर्धा.व संकलक : 60-70 कोटी वसुल होऊ शकेल नवीन मालमत्ता 3539 त्याचे कर योग्य मुल्य 3.06 कोटी व वाढलेला कर 2.45 कोटी.नवीन वर्षमध्ये ही रक्कम ॲड होईल.वार्ड ड मधील वसुली कमी आहे तेथील अक्षेप वगैरे आलेले आहे.जातीने लक्ष देऊन येथील वसुली करणार आहोत.

श्री.त्र्यंबक तुपे :कराच्या बाबत अनेक प्रकरण वादग्रस्त आहेत अशी प्रकरणी तडजोड करून निकाली काढावी. उद्दीष्टात ठरवितांना होर्डीग्ज,टावर्स,नवीन मालमत्ता गृहीत धरतो.वादग्रस्त प्रकरणे होतात त्यामूळे वसुली होत नाही त्याचा विकास कामावर परीणाम होतो.2-3 वार्डात वसुली कमी नवीन उपाययोजना वसुलीसाठी येथे करणार काय? टॅक्स संदर्भात अनेकाची कोर्ट प्रकरण आहेत वर्षानुवर्ष प्रकरण चालू असतात.त्यामुळे वसुली होत नाही. होर्डीग्ज चे सेलॲड कडे मोठी रक्कम होती.अशी किती प्रकरणे आहे ती निकाली काढावी.पुढील बैठकीत माहिती दयावी.

श्रीमती प्रिती तोतला :वार्ड ड ची वसुली कमी झाली. कमर्शियल भागात वसुलीसाठी कॅम्प लावावे. आम्हीही मदत करू सर्वाच्या सहकार्यानेच वसुली होईल तरच विकास कामे होणार आहे या वार्डात श्री. भोजने यांचेकडे अनेक कामे सोपविली त्यामुळे वसुलीसाठी कर्मचारी दयावे.

कर निर्धा.व संकलकःवसुलीसाठी कॅम्प लावण्यात येईल.

श्री.मीर हिदायत अली :मोबाईल टावर्स किती नवीन 200 टावर्स झालेले आहे अशी माहिती आहे.

कर निर्धा.व संकलक :एकूण 373 टावर्स आहेत.विना परवानगीचे त्यांना डबल टॅक्स लावला त्यांनी 50 टक्के रक्कम भरणा केली 5-6 कोटी बाकी आहे मा.न्यायालयात प्रकरण आहे. विधी सल्लागार माहिती देतील.

श्री.मीर हिदायत अली :मागिल बैठकीत 125 टावर्स होत असल्याचे माहिती दिली ते काम पुर्ण झाले का ?अनेक नवीन इमारतीवर टावर्सचे काम चालू असतांना दिसून येते.

कर निर्धा. वसंकलक :46 अनधिकृत टावर्स आहे. टावर्सच्या संदर्भात काही एजन्सीज कोर्टात गेलेले आहे.

मा.सभापती : काम चालू असतांना बंद करायला पाहिजे त्यामुळे कोर्टात जाण्याची संधी मिळणार नाही.

कर निर्धा व संकलक :व्यक्ती कार्टात जात नाही संबधीत एजन्सी कोर्टात जाते.

श्री.त्र्यंबक तुपे :टावर्स शहरातच होतात कुणाच्या घरावर किंवा जागेवर काम चालू असते त्यावेळी ते थांबविले तर यावर आळा बसेल.ज्यांचे घरावर टावर्स आहे ते टॅक्स भरणा करीत नसतील त्यांना नोटीस देवून कार्यवाही करावी. घरमालकावर दंड आकारावा ते

भरतील किंवा कंपनीकडून वसुली करतील.टावर्स धारक ही तिसरी पार्टी आहे.ज्याचे घरावर टावर्स आहे त्यांना जबाबदार धरावे दुर्घटना घडली तर जबाबदार कोण असणार आहे.नियमाने टावर्स उभे करत नसतील तर गुन्हे दाखल करावे. स्वत:हुन मनपाकडे येतील.परवानगी शिवाय टावर्स उभारणार नाही कायदेशीर कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

श्री.जहागीर खान :मी पत्र दिले माझ्या वार्डात नाल्याच्या जागेवर काही लोक अतिक्रमण करून कब्जा करीत आहे. 40 फुट रूंद नाला 10 फुट झाला संबधीतांनी जागा विकली तेथे घर झाले. नाला साफसफाईचे टेंडर काढले नाला साफ केला नाही.कचरा जशाच्या तसा आहे नाल्याचा प्रवाह बंद होऊन नाला अरूंद झाला.नाल्याच्या जागेवर प्लॉट करून विक्री होत आहे. पार्कींगच्या जागेवर दुकाने झाली त्यांना कलम 260,478 नुसार नोटीस देवून कार्यवाही का होत नाही.हे सर्व अतिक्रमण हटवावे.

प्रशासकीय अधिकारी :सदर ठिकाणी इमारत निरीक्षक यांना चौकशी करण्याच्या सुचना दिल्या होत्या काल पाहणी झाली पुन्हा पाहणी करणार आहेत त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.त्र्यंबक तुपे :होर्डीग्ज टेंडर बाबत काय कार्यवाही केली. कोणत्या एजन्सीचे कोर्टात प्रकरण केंव्हा पासून आहे किती रक्कम त्या एजन्सीकडे आहे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :गजानन महाराज मंदीर चौकात ते सेवनहिल पर्यतच्या रस्त्यावर झाडे व कुंडया वाले बसतात. ते अतिक्रमण हटवावे पुन्हा तेथे बसू देवू नये अशी कार्यवाही करावी.

प्रशासकीय अधिकारी:या संदर्भात माठ व झाडे विक्रेतेवर औरंगपूरा येथे मोहिम राबविली 300-350 प्लॅन्ट जप्त करून उदयान मध्ये जमा केले. गजानन महाराज मंदीर ते सेव्हनहिल रस्त्यावर मोहिम राबविली चार ट्रक जवळपास 550 झाडे जप्त करून उदयानमध्ये पाठविली पुन्हा एक आठवडा तेथे सतत मोहिम राबवावी लागेल.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :फुटपाथवर अतिक्रमण,एक अतिक्रमण काढण्यास आठ दिवस लागत असेल तर शहरात अनेक ठिकाणी अतिक्रमण केलेले दिसून येईल जेथे पाण्याची लाईन असते तेथे हे लोक बसतात पाणी मिळते रस्त्यावर घाण करून ठेवतात. जे टॅक्स भरतात त्यांना आठ आठ दिवस पाणी मिळत नाही या लोकांवर तातडीने कार्यवाही करावी. पुन्हा बसणार नाही याची दखल घ्यावी.

प्रशासकीय अधिकारी:अतिक्रमण विभागाकडे दोन वाहने आहेत साहित्य घेवून जाणे व पुन्हा येणे अशा दोन ट्रिप झाल्यावर पुर्ण दिवस निघून जाते अशी परीस्थिती आहे तरी सुध्दा या बाबतीत जास्तीत जास्त लक्ष देवून पुढील आठ दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

श्री.त्र्यंबक तुपे : हे लोक रस्त्यावर घाण करतात.तेथे साफसफाई ही कर्मचा-यांना करावी लागते महापालिकेवर बोजा पडतो.तेथे टॉयलेटचा ,पाण्याचा प्रश्न आहे. आरोग्यास धोकादायक होऊ शकते त्यासाठी पुर्ण शहरात ही मोहिम राबवावी.त्या लोकांना एकाच ठिकाणी जागा देता येत असेल तर तशी कार्यवाही करावी.आता होर्डीग्जचा खुलासा करावा.

श्री.अनिल जैस्वाल : सिडको आंबेडकर चौकात 15-30 मिनिटाला ट्रॅफिकची कोंडी होते. 7 लोकांचा मृत्यू झाला तेथे सिग्नल बसविण्यात यावे.तेथील झालेले अतिक्रम काढावे. कराच्या संदर्भात चर्चा झाली. प्रत्येक वार्डात दवाखाने, व टावर्स किती आहे याची माहिती सर्व सदस्यांना पुढील बैठकीत देण्यात यावी.

मा.सभापती :आंबेडकर चौकात असलेले अतिक्रमण तसेच गजानन महाराज मंदीर चौक ते सेवनहिल रस्त्याच्या बाजूचे अतिक्रमण काढावे साहित्य जप्त केल्यानंतर परत देवू नये शहरात फुटपॉथवर हातगाडया उभ्या असतात त्यांचेवरही कार्यवाही करावी.

श्री.जहागीर खॉन :माझ्या वार्डात 50 खाटाचा दवाखाना होणार होता. अदयाप कार्यवाही का केली नाही.

मा.सभापती :वार्ड निहाय दवाखाने व टावर्स किती सर्व सदस्यांना पुढील बैठकीत माहिती दयावी. होर्डीग्ज बाबत खुलासा करावा.

उपआयुक्त(श्री पवार):परवानगी असलेल्या 248 होर्डीग्ज एप्रिल 2012 ते मार्च 2014 पर्यंत 80 लक्ष उत्पन्न प्राप्त झाले मार्च 2013 ते ऑक्टोबर 2013 या कालावधीतील थकबाकी होती ती 10 दिवसात एकूण 32 लक्ष भरणा झालेला आहे.एप्रिल 2014 ते मार्च 2015 या कालावधीत अपेक्षीत उत्पन्न 1.56 कोटी आहे होर्डीग्ज ची वसुली प्रभावी पणे होण्यासाठी खाजगी अभिकर्ता नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया राबविली होती, परंतु त्या निविदे प्रक्रियेला कोर्टामध्ये आवाहन दिलेले आहे.प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामूळे सध्या स्थगित आहे.

मा.सभापती :मा.न्यायालयाचा निकाल लागून दोन महिणे झाले.टेंडर प्रक्रिया केली होती निकाल मनपाच्या बाजूने लागलेला आहे.माहिती नसेल ती घ्यावी फक्त निविदा ओपन करण्याची कार्यवाही करायची आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :कोणती कंपनी होती किती रक्कम येणे बाकी आहे.विधी सल्लागार यांचे कडून माहिती घ्यावी.माझ्या माहिती प्रमाणे सेलअँड कडून 70-75 लक्ष येणे आहे.

मालमत्ता अधिकारी :सेलअँड कंपनीला 2003 ते 2010 पर्यंत एजन्सी नियुक्त होती 77 लक्ष त्यांचेकडे बाकी होते. ते भरत नव्हते म्हणून एजन्सी कोर्टात गेले सध्या कोर्टात प्रकरण चालू आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :ती कंपनी पैसे भरणार की नाही चर्चा केली का? कोर्टात त्या प्रकरणाची काय परीस्थिती आहे.पाठपुरावा करतो की नाही,

मालमत्ता अधिकारी :दुसरे वसुली संदर्भातील टेंडर होते मा.न्यायालयाचा निकाल लागलेला आहे आता टेंडर ओपन करायचे आहे.:मागिल महिण्यात निकाल लागला.होर्डीग्जच्या वसुली संदर्भात अभिकर्ता नियुक्त करीत आहोत.टेंडरची कार्यवाही सुरू केली टेंडरची पॉकीट ओपन केले तपासणीसाठी मुख्यलेखापरीक्षक यांचेकडे पाठविले आहे.

मुख्यलेखा परीक्षक :सदर संचिका आलेली होती त्याच दिवशी रिमार्क देवून पाठविली. निविदा ओपन केली त्यावर कोणत्याही अधिका-यांनी रिमार्कस न लिहिता माझ्याकडे पाठवून दिले त्यांचे काय अभिप्राय आहेत ते त्यांनी दयावे त्यामूळे परत पाठविले आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :अनेकदा यावर चर्चा झाली. कार्यवाही होत नाही वसुली वाढत नाही त्यामूळे वार्डात कामे होत नाही. ही जबाबदारी कोणी घेणार की नाही.विभाग प्रमुखानी जाबाबदारी घ्यावी पुढील बैठकीपर्यत कार्यवाही करावी.

उपआयुक्त(श्री पवार) :या बाबतची पुर्ण कार्यवाही झाली आहे. आढावा घेवून पुढील बैठकीपर्यत कार्यवाही करण्यात येइल.

मा.सभापती :दोन दिवसात निर्णय घ्यावा.टेंडर प्रोसेस सुरू करावे नसता जे जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही होईल.तसेच मोबाईल टावर्स इलिगल उभे राहत असेल तर संबधी घर मालक,जागा मालक यांना तसेच एजन्सीला नोटीस देवून कार्यवाही करावी नियमाने होत नसेल तर त्यांचेवर गुन्हे दाखल करावे.

श्रीमती फिरदोस फातेमा:श्री.झनझन तातडीने कार्यवाही करतात.सर्वांनी त्यांचेप्रमाणे वेळीच काम केले तर ही वेळ येणार नाही.रोषनगेट ते आझादचौक रस्त्याच्या संदर्भात 2 वर्षापासून एक महिण्यापासून दुभाजकाचा विषय मांडते. या रस्त्यासाठी लोकांनी जागा दिल्या,धार्मीक स्थळ होते ते सर्वाच्या सम्मतीने हटविले.रस्ते तयार होतात परंतु दुभाजक नसेल तर

वाहतूक सेफ्टी राहणार नाही अनेक अपघात होतात लोकांचा मृत्यू होत आहे. दुभाजकाचे थोडे काम बाकी आहे. पत्र दिले परंतु कोर्ट प्रकरण चालू आहे स्थगिती आहे असे उत्तर दिले जाते. होर्डीग्ज, टावर्स रस्तेचा प्रश्न केला तर कोर्टाचे कारण दाखविले जाते.याचा पाठपुरावा करणे प्रशासनाचे काम आहे. दुभाजकाचे काम करण्यासाठी जेएमएस करावे लागेल असे उत्तर दिले.अर्ध्या रस्त्याचे काम केले ते जेएमएस न करता केले का.त्याची परवानगी घेतली होती का सर्व माहिती दयावी.

श्री.काशिनाथ कोकाटे:या रस्त्याचे 50 टक्के दुभाजकाचे काम केले ते मेजरमेंन्ट न घेता केले का? झालेले काम चुकीचे असेल किंवा पुढील काम कुणाच्या सांगण्यावरून होत नसेल त्या रस्त्यात कुणाची किती जागा बाधीत होते माहिती घेवून जिल्हाधिकारी कार्यालयास रक्कम पाठविली होती. त्यावेळी जेएमएस केले नव्हते का ? या संदर्भात शहर अभियंता यांना आदेशीत करावे आठ दिवसात या रस्त्याचे काम सरू होईल याची दखल घ्यावी.

श्री.मीर हिदायत अली:अनेकदा या रस्त्याचा प्रश्न मांडला उदयापासून काम सुरू करावे नसता आम्ही अधिका-यांच्या कॅबीनमध्ये कामकाज बंद करू.

श्री.त्र्यंबक तुपे :निविदा झाली असेल तर जेएमएस केले का?जे काम झाले ते इललीगल झाले का? तेथील लोक काम करू देत नाही असे म्हटले,ती जागा भुसंपादन केली की नाही? जेएमएस करायचे म्हणजे भुसंपादन केली नाही का?काम होऊ देत नसेल तर शंका येते निविदा अधिकृत की अनधिकृत आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे:भुसंपादन केले त्यावेळी जेएमएस झाले असेल आता जेएमएस करायचे पत्र देणे योग्य नाही. आजच्या आज पोलीस संरक्षण घ्यावे काम सुरू करावे.

श्री.मीर हिदायत अली:नगररचना विभागाने मेजरमेन्ट दयावे.आम्ही सर्व वार्डाचे संबधीत सदस्य तेथे उपस्थित राहू.शहर अभियंता यांची टीम येईल कोणीही काम थांबविणार नाही.

मा.सभापती : जेएमएस करण्याचे बाकी आहे का ?

शहर अभियंता : जे काम करता येइल ते या रस्त्याचे काम केले. जे थांबले तेथे लोक काम करू देत नाही.तेथील लोक वाद निर्माण करतात दोन वेळेस कर्मचारी परत आले तेथे गेल्यानंतर दोन प्रकारचे ग्रुप तयार होतात प्रत्येकाकडे दोन वेगवेगळे नकाशे असतात,दोन्ही ग्रुप सेन्ट्ररलाईज वेगवेगळी दाखवितात. स.सदस्य उपस्थित असेल तर समोपचाराने हा प्रश्न सोडवून काम सुरू करण्यात येईल.

श्री.त्र्यंबक तुपे :जेएमएस झाले.नगररचना विभागाने नकाशा दिला असेल त्यानुसार कार्यवाही का होत नाही.

शहर अभियंता :2-3 ग्रुप प्रत्येकाकडे दोन प्रकारचे नकाशे आहेत.दोन्ही सेंटर लाईन वेगळी मार्ग काढण्यासाठी आम्ही नगररचना विभागाला सेंटर लाईन द्यायला सांगितले आपण समोर राहावे प्रश्न मिटला तर उदया काम सुरू करू.

श्री.काशिनाथ कोकाटे:दोन प्रकारचे नकाशे होऊ शकत नाही असे करता येते का ?

श्री.त्र्यंबक तुपे : नगररचना विभागाचा एकच नकाशा असावा तेथे रस्त्याचे काम व्हावे नागरीक मागणी करतात. काही विरोध करतात तर चुकीचे करीत आहोत का? ज्याप्रमाणे भुसंपादन केले टेंडर केले त्याप्रमाणे काम करावे.

श्री.काशिनाथ कोकाटे : ही जबाबदारी प्रशासनाची आहे.जनतेला सेवा देणारी ही संस्था आहे प्राधान्याने काम व्हावे.रस्त्यासाठी भुसंपादन केले त्यावेळी मार्कीग केले असेल मोबदला दिला काहींना दिला नसेल तो दयावा प्रत्येक रस्त्याचे काम कुणी थांबविणार असेल काम होणार

नाही.सर्व विभागाचे अधिकारी यांनी समन्वय साधून या रस्त्याचे काम प्राधान्याने सुरू करावे पोलीस संरक्षण घ्यावे कार्यवाही करावी.

शहर अभियंता : कोर्ट केसेस पण आहे. 140 ते 300 चैनेजमध्ये कोर्ट केस आहे कार्यकारी अभियंता यांनी म्हटले.

श्री.मीर हिदायत अली:आझाद चौक पासून राममंदीर पर्यत दुभाजकाचे काम केलेले आहे पुढील काम का थांबविले गेले.

श्री.त्र्यंबक तुपे :जेएमएस करायचे असे पत्र स.सदस्या यांना कुणी पाठविले ते योग्य आहे का ?काही ठराविक लोकांच्या मागणीनुसार काम थांबविणार असेल तर योग्य नाही.

कार्य.अभियंता(अ ड) :स.सदस्या यांनी काम का थांबले विचारणा केली होती,या विभागाने केलेली कार्यवाही लोकांनी मागणी या बध्दल नगररचना विभागाकडे दिनांक 31-12-2014 चे पाठविलेले पत्रा नुसार केलेली कार्यवाही बाबत स.सदस्या यांना कळविली.नगररचना विभागाकडून माहिती आली नाही.या विभागाचे कर्मचारी व आम्ही तेथे जागेवर गेलो होतो. डिमार्केशन चालू असतांना लोक जमा झाले. तेंव्हा नगररचना विभागाचे कर्मचारी निघुन आले लोकांनी नकाशा दाखवला त्याप्रमाणे डिमार्केशन करावे मागणी केली. जेएमएस प्रमाणे नगररचना विभागाने मार्कींग करून दिली तर काम करता येईल हेच पत्राने कळविले आहे.

श्री.मीर हिदायत अली :उडवाउडवीची उत्तरे मिळतात. उदया मार्कींग साठी कर्मचारी केंव्हा येत आहे आम्ही सर्व सदस्य तेथे उपस्थित राहू. काम तातडीने करून घ्यावे.

कार्य.अभियंता(अ ड) :काम करण्यास तयार आहे नगररचना विभागाने मार्कींग करून दयावे.

शहर अभियंता :उदया सकाळी 10-11 वाजेच्या दरम्यास सर्व संबधीत अधिकारी ठेकेदार व मी स्वतः उपस्थित राहिल. स.सदस्यही असतील सर्वांच्या समोपचाराने सेन्ट्रल लाईन काढून काम करून घेवू.

श्री.संजय चौधरी :चिकलठाणा भागात जिल्हा रूग्णालयाच्या 200 खाटाचे इमारतीचे बांधकाम चालू आहे.त्यास बांधकाम परवानगी दिली का ?त्यासमोरचा रस्ता राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषीत झाला तो किती मीटरचा आहे असे असतांना परवानगी देता येते का , दिली नसेल तर बांधकाम कसे चालू आहे. पार्कींगची व्यवस्था आहे का सर्व माहिती दयावी.

मा.सभापती :संबधीत विभागाचे अधिकारी पी जी पवार येथे आहे त्यांनी या प्रकरणाची संचिका मागवून घ्यावी.

श्री.संजय चौधरी : चिकलठाणा गट नं 408 वर पोल्ट्री फॉमची इमारत पाडण्यात आली आाणि त्यास भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले.नियमाने बरोबर आहे का ?

श्री.त्र्यंबक तुपे :इमारत अनधिकृत होती म्हणून तोडण्यात येते दुसरीकडे त्याच इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र देता येते का ?

उपअभियंता(श्री.संधा) :श्री योगेश झवेरी यांना गट नं 408 मध्ये बांधकाम परवानगी दिली आहे त्यांनी फ्रन्ड साइउला अनधिकृत बांधकाम केले होते.ते पाडण्यात आले त्यानंतर त्यांनी भोगवटा प्रमाणपत्रासाठी मागणी केली त्यानुसार संचालक, नगररचना पुणे यांना मा.आयुक्ताच्या परवानगीने पत्र दिले त्यास त्यानी मान्यता दिली त्यानुसार मा.आयुक्तांची मान्यता घेवून त्यांना भोगवटा प्रमाणपत्र दिले.

श्री.संजय चौधरी :सदर इमारतीचे बांधकाम पुर्ण झालेले आहे का ?

उपअभियंता(न.र) :त्या इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले आहे.संचिका बरोबर आहे सर्व कागदपत्र त्यात लावलेले आहे.

श्री.संजय चौधरी :चुकीची माहिती देत आहे.बांधकाम पुर्ण झालेले नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे : संचालक पुणे नगररचना यांना पत्रव्यवहार केल्याचे म्हटले. सन 2009 पासून संचिका चालू आहे क्रमवारीनुसार माहिती दयावी.भोगवटा प्रमाणपत्र देतांना काय पाहणी केली, कोणत्या नियमानुसार प्रमाणपत्र दिले.तेथे पोल्ट्री फॉम होते का, नकाशा मंजूर असेल तर कुण्या अधिका-यांनी पाहणी केली.संचालक पद येथे असतांना पुणे संचालक यांना पाठविण्याची गरज का पडली या प्रकरणात सदस्यांनी बदनामी झाली हा गंभीर विषय आहे सभागृहाला कुणावर ॲक्शन घेण्याची वेळ येणार नाही अशा प्रकारे खुलासा करावा.

श्री.त्र्यंबक तुपे :पुणे येथील संचालक यांचेकडे प्रस्ताव पाठविला. मनपाचे सहाय्यक संचालक नगररचना हे हा प्रस्ताव मंजूर करीत नव्हते काय ?अतिक्रमण केले बांधकाम पाडल्याचे सांगतात.ते पाडतांना कायदेशीर बाबी तपासल्या असतील. भोगवटा प्रमाणपत्र देतांना तेथील पाहणी झाली असेल या प्रकरणी मा.न्यायालयात काय स्थिती आहे.संचालक पुणे यांचेकडे पाठविण्याची आवश्यकता का पडली. संचिकेवर कोणकोणत्या अधिका-यांच्या सहया आहेत सर्व माहिती मिळावी.

श्री.अनिल जैस्वाल :2009 पासून हे प्रकरण चालू आहे.मा.न्यायालयात प्रकरण असतांना भोगवटा प्रमाणपत्र दिले.आताच म्हटले की अतिक्रमण काढले. बैठक संपल्या नंतर स्थळ पाहणी करावी एखादया दुकानची जागा असेल शटर्स बसविले नसेल तर भोगवटा प्रमाणपत्र दिले जात नाही .या ठिकाणी कसे दिले.

श्री.त्र्यंबक तुपे :ग्रीन झोन आहे काय ? अशा ठिकाणी कशासाठी मान्यता दिली जाते.

मा.सभापती :सविस्तर खुलासा करावा.

उपअभियंता(न.र) :श्री.योगेश झवेरी ग क्र 408 चिकलठाणा या ठिकाणी दिनांक 15-1-2009 बांधकाम परवानगी दिली.

श्री.जगदीश सिध्द : कोणते झोन आहे परवानगी कशाची मागीतली होती.

उपअभियंता(न.र) :ग्रीन झोन आहे पोल्ट्री फॉमची परवानगी मागीतली होती.

श्री.त्र्यंबक तुपे :पोल्ट्री फॉम साठी परवानगी घेतली जेंव्हा भोगवटा प्रमाणपत्र दिले पाहणी केली असेल त्यावेळी तेथे पोल्ट्री फॉर्म, कोबंडया होत्या का ?

उपअभियंता (न. र) : नाही.

श्री.जगदीश सिध्द :परवानगी घेतली परंतु पोल्ट्री फार्म होणार या दृष्टीने बांधकाम केलेले होते का, नकाशा दाखवावा ही गंभीर बाब आहे पाहणी करणे आवश्यक आहे.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री त्र्यंबक तुपे :पोल्ट्री फॉर्म च्या परपजसाठी परवानगी होती परंतु तेथे कोबंडया नव्हत्या आताच म्हटले.याचा अर्थ नियमाचा भंग केला चुकीने प्रमाणपत्र दिले सभागृहाची दिशाभूल केली.

मा.सभापती :संचालक नगररचना पुणे यांना पत्र देवून काय कळविले होते वाचून दाखववे.

उपअभियंता(न.र) :तत्कालीन मा.आयुक्त श्री.हर्षदिप कांबळे असतांना संचालक,नगररचना महाराष्ट्र राज्य पुणे यांना दिनांक 12-2-2014 रोजी पत्र दिले त्यात विषय पोल्ट्री फॉम साठी भोगवटा प्रमाणपत्र मिळणे.संदर्भामध्ये महानगरपालिका क्षेत्र क्रमांक 49917/17 2008-09 दिनांक 6-9-2008 प.क्र 912/2008 दिनांक 15-02-2009 महानगरपालिकेत प्राप्त झालेले श्री.योगेश झवेरी, C/o चिकलठाणा कॅनॉट प्लेस, सिडको औरंगाबाद यांना भोगवटा प्रमाणपत्र देणे बाबत.

पत्रात असे नमुद केले की वरिल विषयी या कार्यालयाने मोहल्ला चिकलठाणा गट क्र. 408 विकास योजना नुसार ग्रीन झोन मध्ये अर्जदार यांनी प्रस्तावित केल्यानुसार संबधीताने पोल्ट्री फॉर्म करीता संदर्भ क्रमांक एक अन्वये विकास परवानगी मंजूर विकास योजनेमध्ये फक्त मिळकतीच्या नमुद केलेल्या वापरानुसार विकास नियत्रंण नियमावली तरतुद एम-7 विचारात घेवून देण्यात आली आहे. दरम्यान असे निदर्शनास आले की अर्जदार यांनी दिलेल्या बांधकाम परवानगी व्यतिरिक्त त्या ठिकाणी अतिरिक्त बांधकाम केले त्याचा तपशिल असा की विकास परवानगी देते वेळी प्रस्तुत बांधकामाचा वापर पोल्ट्री फॉम या स्वरुपाचा देण्यात आला होता.परंतु अर्जदार यांनी उक्त ठिकाणी केलेले बांधकाम हे अद्यावत पध्दतीने आधुनिक सामुग्री ॲडव्हान्स मटेरियल वापरून केलेले आहे. केलेले बांधकाम हे पोल्टी फॉम चे सुसंगत दिसुन येत नाही.अर्जदार यांनी परवानगी व्यतिरिक्त जादा बांधकाम केले आहे. ते अमर्यादेत आहे अशा प्रकरणात दंडात्मक कार्यवाही करून त्यास नियमित करावे किंवा त्या विषयी काय तो निर्णय घ्यावा.उक्त दोन्ही मुद्दे बाबत या कार्यालयास मार्गदर्शन करावे जेणे करून दाखल भोगवटा प्रमाणपत्रा विषयी योग्य निर्णय घेता येईल.

श्री.जगदीश सिध्द : तेथील जागेची छायाप्रत पाठविली होती का ?

उपअभियंता (न.र) :प्लॅन , पाठविला होता.

मा.सभापती :आलेला खुलासा वाचून दाखवावे.

उपअभियंता(न.र) :आलेले पत्रात असे नमुद आहे की ,

मा.आयुक्त,
महानगरपालिका औरंगाबाद

विषय :पोल्ट्रीफॉम करीता भोगवटा प्रमाणपत्र मिळणे बाबत
महानगरपालिकेने पत्र क्रमांक 281 दिनांक 12-2-2014

महोदय,

प्रस्तुत प्रकरणी आपले पत्र संदर्भ क्रमांक 1 नुसार मोहल्ला चिकलठाणा औरंगाबाद येथील गट क्र 408 पैकी 8100 चौ.मीटर जागेत पोल्ट्री फॉम या प्रयोजनासाठी दिलेल्या बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने संबधीत भोगवटा प्रमाणपत्र विषयी संचालयाने मार्गदर्शन अपेक्षीले आहे.त्या अनुषंगाने आपणास खालील प्रमाणे कळविण्यात येते.

सर्वसाधारणपणे एखादया विशिष्ट इमारतीसाठी प्रयोजनासाठी कोणत्या प्रकारचे बाधकाम साहित्य वापरावे त्याबाबत स्पष्टता विकास नियत्रंण नियमावलीमध्ये नाही.व ती असणे अभिप्रेत देखिल नाही.त्यामुळे आधुनिक पध्दतीने तंत्रज्ञान /साहित्य वापरून केलेले बांधकाम मान्य करण्यास हरकत नाही.अर्जदाराने केलेले अतिरिक्त बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय मर्यादेत असल्याने तेही नियमाधीन करण्यास हरकत नाही.तरी प्रत्यक्ष जागेवरील बांधकाम त्याचा उपयोग ई.व स्थानिक परीस्थिती विचारात घेवून नियोजन प्राधिकरण या नात्याने औरंगाबाद मनपाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 व विकास नियत्रंण नियमावली मधील तरतुदीच्या अधिन राहुन महानगरपालिकेच्या स्तरावर योग्य कार्यवाही करणे योग्य राहिल.

श्री.जगदीश सिध्द :1966 चे नियम काय आहे स्पष्ट करावे.

श्री.त्र्यंबक तुपे :महापालिकेने त्याचे स्तरावर निर्णय घ्यावा असे संचालक पुणे यांनी म्हटले आहे. भोगवटा प्रमाणपत्र दयावे किंवा देणे योग्य आहे असे म्हटलेले नाही

उपअभियंता (श्री.संधा):जेंव्हा पत्र पाठविले तेंव्हा संचिका त्यांनी मागवून घेतली होती प्रत्यक्ष पाहणी करून आम्ही आमचा रिपोर्ट दिला जे की इतके बांधकाम केले इतके जास्तीचे केले, दंडात्मक कार्यवाही करता येइल असा अभिप्राय दिला आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात यावे देण्यास योग्य असे संचालक पुणे यांनी त्यांचे पत्रात म्हटलेले नाही.कशासाठी पाठवले अप्रव्हल दिले का,मा आयुक्तांनी सागितले म्हणून केले. ट्रस्टी बदलतात तसे आयुक्तही बदलून जातात.एखादे आयुक्तांने चुकीचे काम केले याचा अर्थ खालचे अधिकारी यांनी काहीही चुकीचे काम करावे असा होत नाही.प्रमाणपत्र देऊन टाका आयुक्ताची मान्यता आहे का ?संचालक नगररचना पुणे यांनी हे भोगवटा प्रमाणपत्र देऊन टाकावे असे म्हटले का ?

उपअभियंता(श्री.संधा) :महापालिकेच्या स्तरावर कार्यवाही करावी असे म्हटले आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :महापालिकेच्या स्तरावर कुणी दिले सही कुणाची आहे.नियमात बसते का ?त्यावेळी सहा.संचालक पद भरले होते का ?पद भरलेले नव्हते म्हणून सल्ला घेतला त्यानी तुमच्या स्तरावर निर्णय घेण्याचे सांगितले उर्वरीत तत्सम संचिकावर परवानगी देण्यास हरकत नाही असे शेरा आलेला आहे.2009 पासुन अनेक संचिका सहा.संचालक नगररचना यांचेकडे पाठविल्या त्या मान्य झाल्या याच प्रकरणात मान्यता दिली नाही असे असतांना प्रमाणपत्र देण्यात आले.ही बाब गंभीर आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :जेंव्हा पुणे संचालक नगररचना यांचे पत्र आले त्यावेळी सहा.संचालक नगररचना हे पद भरलेले होते का ?

श्री.काशिनाथ कोकाटे :कशासाठी मार्गदर्शन घेतले येथील सहाय्यक संचालक यांना अधिकार होते की नाही

उपअभियंता(न र) :अधिकार होते.

श्री.काशिनाथ कोकाटे :अधिकार होते तर का पाठविले.असे चुकीचे करून ,सेफ राहायचे होते का म्हणून केले का ?

श्री.संजय चौधरी :कक्ष प्रमुख, भोगवटा प्रमाण यांनी या मालमत्तेस भोगवटा प्रमाणपत्र देता येत नाही असे संचिकेवर नमुद केले आहे.

उपअभियंता(न र) :कक्ष प्रमुख यांनी संचिकेवर असे म्हटले की वरील प्रमाणे मार्गदर्शन प्राप्त होईपर्यत भोगवटा प्रमाणपत्र देणे संयुक्त वाटत नाही व त्यांचे अभिप्राय नंतर प्रकरणी भोगवटा प्रमाणपत्र देणे बाबत निर्णय घेणे शक्य होईल असे वाक्य आहे.

श्री.संजय चौधरी :कोणत्याही इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र दयायचे असेल तर ती इमारत पुर्ण झालेली असावी असे नियमाने आहे.तसेच या बाबत कोर्ट प्रकरण चालू आहे पोल्ट्री फॉमचे काम चालू होते स्ट्रक्चर कसे असावे मा.कोर्टाने विचारणा केली होती.त्यानंतर पडेगाव येथील पोल्ट्री फॉम चे उपसंचालक यांचेकडून पोल्ट्री फॉम कसे असावे त्याचा नकाशा घेवून ते मा.कोर्टासमोर सादर केलेले होते.ते नॉमनुसार बरोबर नव्हते म्हणून कोर्टाने स्थगिती दिली ती इमारत पाडलेली असतांना भोगवटा प्रमाणपत्र देता येते का?

श्री.त्र्यंबक तुपे : आजच प्रशासकीय अधिकारी यांना पाठवून तेथील पंचनामा करून घ्यावा.कायदेशीर बाबी तपासुन ते रद्य कसे करता येईल तशी कार्यवाही करावी. अधिकारी त्या मालकास मदत करीत असेल तर कार्यवाही करावी. जे नियमाने परवानगी मागतात पैसे भरण्यास तयार असतात त्यांना दिली जात नाही.बिल्डर वर इतर लोकांसाठी विशेष परवानगी पुणे येथून घेतली जाते. संचालक पुणे यांनी त्याचे पत्रात

महापालिकेने आपल्या स्तरावर कार्यवाही करावी असे म्हटले म्हणजे उपआयुक्त,प्रशासकीय अधिकारी यांनी स्थ्ळ पाहणी करून पंचनामा करून घ्यावा त्या इमारतीचे फोटो घ्यावेत. चुकीचे काम करून महापालिकचे नाव बदनाम कुणी करीत असेल तर त्यांना पाठशी घालण्याची गरज नाही कार्यवाही करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे: हा विषय गांभीर्याने घ्यावा ही लहान चुक नाही याला अनियमीतता म्हणता येणार नाही.अधिकारी यांना पाठवून अहवाल देण्याचे आदेशीत करावेच तसेच कायदयानुसार बांधकाम मुळ नकाशाप्रमाणे नसेल तर ते निष्कषीत करावे चौकशी समिती नेमावी 4 दिवसाचा कालावधी दयावा अहवाल आणावा त्यानुसार कार्यवाही करावी तरच पुढील चुका होणार नाही.जे गैरवापर करतात त्यांना प्रशासनातील लोक मदत करीत असेल तर योग्य नाही.जे सत्य आहे ते समोर यावे माझ्या माहिती प्रमाणे श्री. कांबळे साहेब आले तेंव्हा डीपी कुलकर्णी हे सहा.संचालक होते या बाबत कायदेशीर बाबीचा अधार घेवून कार्यवाही करावी.चुक झाली असेल तर दुरूस्त करावी.

मा.सभापती :आताच भोगवटा प्रमाणपत्रा विषयी मुद्दा मांडला हा गंभीर विषय आहे.या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नेमण्यात येते त्यात प्रशासकीय आिकारी व उपआयुक्त श्री.झनझन यांनी सदर ठिकाणी लगेच जाऊन पाहणी करावी फोटोग्राफी करावी.या ठिकाणी कशाच्या अधारे बांधकाम परवानगी दिली व भोगवटा प्रमाणपत्र कोणत्या नियमाने दिले याची संपुर्ण माहिती घ्यावी.संचिका तपासावी आठ दिवसात चौकशी करावी. अतिरिक्त आयुक्त ही स्तळ पाहणी करतील.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी : आजच्या सभेत रस्त्याचे ,पुलाचे कामाचे प्रस्ताव आहे याच बरोबर मागील बैठकीत अनेक कामे मंजूर झाली त्या कामाचे टेंडर झाले ती कामे अर्धवट आहे काही ठिकाणी कामे केली नाही. माझ्या वार्डातील 10 लक्षचे काम एक वर्षापासून चालू आहे काम पुर्ण झाले नाही ते काम ठेकेदार करीत नसेल त्यांना काळया यादीत टाकावे योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :1-2 वर्षापुर्वी ज्या ठेकेदाराची कामे घेतली ते कामे करीत नसतील तर त्याना काळया यादीत टाकावे.

कार्य.अभियंता(ई/फ) :सदरचे काम ए एस कन्स्ट्रक्शन यांनी घेतले आहे त्यांचेशी चर्चा केली 8-10 दिवसात काम सुरू होईल.

श्री.मीर हिदायत अली :ठेकेदाराचे बील थांबविलेले आहे त्यामूळे काम सुरू करीत नाही. काम करणार नव्हते तर ठेकादारांनी काम का घेतले.त्यांना काळया यादीत समाविष्ट करावे.

मा.सभापती : अनेक वार्डात 2-6 महिण्यापुर्वी निविदेला मंजूरी दिलेल्या आहे वर्कऑर्डर दिल्या ते कामे आठ दिवसात सुरू करावी जी एजन्सी काम करीत नसेल त्यांना काळया यादी टाकावे तसेच ते काम दुस-या क्रमांवरील एजन्सीला दयावे.

श्री.अनिल जैस्वाल :सिडको आंबेडकर नगर कडून येणारा नाला 30 वर्षापासूनचा जुना आहे तो माझ्या वार्डातून जातो या नाल्याच्या बाजूला पार्वती कन्या विद्यालय ,बळीराम पाटील हायस्कूल मनपा हायस्कूल सोनामाता हायस्कूल शाळा व 4 मंदीरे आहेत बळीराम विदयालयाचे 5 हजार विदयार्थी तेथून जा-ये करतात.हे नाला वार्ड क्र. 2,17,19 व 20 या वार्डातून जातो.नाल्याची भिंत ढसळलेली आहे मा.आयुक्तांनी पाहणी केली.काम करणे आवश्यक आहे 64 लक्षचे काम आहे निधी नसल्यामूळे काम होऊ शकले नाही.यासाठी वाढीव बजेट मध्ये तरतुद करून काम सुरू करावे.

कार्य.अभियंता(ब /क) :सदर ठिकाणी पाहणी केली तेथील कामाचे 63 लक्षचे अंदाजपत्रक तयार केले.तरतुद नसल्यामुळे कार्यवाही केली नाही रिवाईज बजेट मध्ये तरतुदी बाबत निर्देश करावे त्यानुसार कार्यवाही करण्यात येइल.

श्री.जगदीश सिध्द :भुमीगत गटार योजनेतून हे काम होत नाही का ?

कार्य.अभियंता(ब /क) :हे नाला ड्रेनेजचे काम आहे भुमीगत गटार योजनेत अंडर ग्राऊन ड्रेनेज सिस्टमचे होते.

श्री.मीर हिदायत अली :भुमीगत गटार योजनेनुसार नाल्यामध्ये मुख्य ड्रेनेज लाईन टाकणे आहे.नाल्यात मोठी लाईन टाकल्यानंतर पाणी वाहणार का ?

कार्य.अभियंता(ब /क) : पावसाचे पाणी नाल्यातून वाहणार, ड्रेनेज लाईनचे पाणी नाल्यातून वाहणार नाही.

मा.सभापती :या नाल्याची मा.आयुक्त यांनी पाहणी केली आहे आताच खुलासा केल्याप्रमाणे त्याठिकाणी काम करण्यासाठी लागणारा खर्च वाढीव बजेट मध्ये तरतुद करून तातडीने काम सुरू करावे.

मा.सभापती : प्रशासकीय अधिकारी व उपआयुक्त (श्री.पवार )यांनी चिकलठाणा येथील पोल्ट्री फॉमचे केलेले बांधकामाची पाहणी करून अहवाल सादर करावा.

श्री.त्रिंबक तुपे : महापालिकेचे कॅमेरामन, पीआरओ,फोटोग्राफर यांना पाठवून शुटींग घ्यावी सर्व माहिती घेवून सादर करण्याचे आदेशीत करावे.

मा.सभापती :नगररचना विभागातील संचिका सोबत घेवून जावे श्री.संधा हेही सोबत राहतील. चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना मोबदला देण्या बाबत खुलासा करावा.

श्री.संजय चौधरी :चार वर्षापासून प्रकल्प विभाग आहे.सुजल निर्मल योजने अंतर्गत स्लम व गुठेवारी भागात शौचालय व पिण्याचे पाणी देण्याची योजना होती अर्ज मागीतले लाभार्थी यांना 14 हजार अनुदान देणार होते शासनाचे यात 90 टक्के 10 टक्के लाभार्थी कडून घेणार होतो.या योजनेची काम का थांबलले आहे.

कार्य.अभियंता(श्री.सिद्दीकी):ही योजना राज्य शासनाच्या आदेशान्वये सुजल निर्मल या योजने अंतर्गत राबविणार होतो.पीएमसीची नेमणूक केली सर्वे केला. विशेष दोन घटकासाठी जे अनु.सूचित जाती व नवबौध्द असतील त्यांचेसाठी ही योजना लागू होती.व्यक्तीगत शौचालयासाठी 12 हजारची व नळ कनेक्शन साठी 4 हजार अशी 16 हजारची तरतूद आहे.शासनाचे 90 टक्के व लाभार्थीकडून 10 टक्के रक्कम घ्यायची आहे.पीएमसीने सर्वे करून 37 कोटीचा डीपीआर शासनाकडे पाठविला त्यास तत्वतः मान्यता दिली.यात शासनाने नोडल एजन्सी नेमली व त्या एजन्सीकडून तांत्रिकदृष्टया योग्य असल्याची तपासणी करून घ्यावी अशा सुचना होत्या तो प्रस्ताव पाठविला त्या एमजीपीने पत्र देवून कळविले की 30.60 लक्ष तपासणी शुल्क भरावे त्या नुसार लेखा विभागाल तसे कळविले परतावा म्हणून ही रक्कम शासन देणार आहे.

मा.सभापती :30 लक्ष भरणा केल्यानंतर किती रक्कम मिळणार आहे.लेखा विभागाला पाठवून किती कालावधी झाला.

काय.अभियंता-ब व क : यात लेखा विभागाने काही मुददे दिले की आता वाटर युटीलिटी कंपनीला पाणीपुरवठयाचे काम दिले. नळकनेक्शन कंपनी देणार आहे या लोकांना नळ कनेक्शन दयायचे असेल तर 9 हजार शुल्क लागेल. परंतु ही शासनाची योजना आहे लाभार्थीला 4 हजार रूपये दिले जातात यातून सुट मिळावी व 4 हजार रू नळ कनेक्शनचे आकारावे असे कार्य.अभियंता (पापू )यांना कळविलेले आहे त्यांचा अहवाल आलेला नाही.

श्री.संजय चौधरी :37 कोटीला मंजुरी मिळून 6 महिणे झाले यात शासन अनुदान देणार असतांना एवढा उशीर होत असेल तर योग्य नाही तात्काळ या बाबत कार्यवाही व्हावी.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी जे रिमार्क असेल ते दोन दिवसात क्लिअर करावे. तसे लेखा विभागास कळवून 37 कोटी उपलब्ध करून घ्यावे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :गजानन महाराज मंदीर ते डॉ.हेगडेवार रूग्णालयाच्या रस्त्यावर मंदीराच्या टर्न वर मोठे खड्डे पडलेले आहे.तेथे अपघात होतात सहा महिणे झाले.मागणी करतो काम होत नाही.

मा.सभापती :कार्य.अभियंता यांनी ताबडतोब कार्यवाही करावी.

श्री.मीर हिदायत अली :चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना 2 वर्षाचा जास्तीच्या कामाचा मोबदला देणार होते दिला नाही त्यामूळे कर्मचारी 24 ते 26 जानेवारी पर्यंत सुट्टीवर जाणार असल्याचे समजते.अशा वेळी सुट्टीवर जाणे योग्य नाही.त्यांना त्याचा मोबदला देण्यात यावा.

मा.सभापती :26 जानेवारीला प्रजा सत्ताक दिन असल्यामुळे कर्मचारी यांना सुट्टी देवू नये साफसफाईचे काम करून घ्यावे त्यांना दयावयाचा मोबदल्या बाबत प्रशासनाने लेखा विभागाला आदेशीत करून 26 जानेवारीपुर्वी त्यांना कामाचा मोबदला दयावा. टप्याटप्याने सर्व रक्कम दयावी.

**विषय क्र. 81 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.20 आंबेडकरनगर येथील मुख्य नाला आर.सी.सी. मध्ये बांधकाम करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम या विभागाच्या सन 2013-2014 च्या दरसुची (DSR) नुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रक रक्कम रू.28,82,962/- चे होत आहे. सदरील कामाचा खर्च प्रो-पुअर बजेट या लेखाशिर्ष अंतर्गत पान क्र. ई-51 अ.क्र.18 करणेस व अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव सादर करण्याची शिफारस करण्यात येते.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.28,82,962/- चा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.20 आंबेडकरनगर येथील मुख्य नाला आर.सी.सी. मध्ये बांधकाम करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.28,82,962/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 82 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स.नं. 3/1 हत्तेसिंगपुरा येथील मंजुर रेखाकंनात (अल कबीर हौ.सोसायटी) येथे आर.सी.सी. पुल बांधणे करीता सा.बां.विभागाच्या सन 2012-13 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.32,22,094/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामाचा खर्च सन 2014-15 अंतर्गत मंजुर रेखांकनात मुलभुत सुविधा पुरविणे या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात येईल.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.32,22,094/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स.नं. 3/1 हत्तेसिंगपुरा येथील मंजुर रेखाकंनात (अल कबीर हौ.सोसायटी) येथे आर.सी.सी. पुल बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.32,22,094/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 83 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्र.क्र.96 हमालवाडा रेल्वेस्टेशन येथील शहर विकास आरखडा आरक्षण क्रमांक-336 न.भू.क्र.18762 मध्ये शाळा इमारत बांधणे बाबतच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2012-2013 च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये 49,99,900/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2014-2015 या आर्थिक वर्षातील प्रो-पुअर बजेट या लेखाशिर्षकामधुन करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

करीता प्र.क्र.96, हमालवाडा रेल्वेस्टेशन येथील शहर विकास आराखडा आरक्षण क्रमांक-336 न.भु.क्र.18762 मध्ये शाळा इमारत बांधणे बाबतच्या कामाचा रक्कम रूपये 49,99,900/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्र.क्र.96 हमालवाडा रेल्वेस्टेशन येथील शहर विकास आरखडा आरक्षण क्रमांक-336 न.भू.क्र.18762 मध्ये शाळा इमारत बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 49,99,900/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 84 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार कलम 41 (2) अ, जल (प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम 1974 व कलम 15 पर्यावरण (संरक्षण) कायदा, 1986 याबरोबर नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, 2000 प्रमाणे निर्देश-भांडवली खर्चामधुन 25% तरतुद नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन 2014-2015 च्या अर्थसंकल्पामध्ये वरीलप्रमाणे भांडवली खर्चामधुन 25% तरतुद नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेमध्ये मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार कलम 41 (2) अ, जल (प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम 1974 व कलम 15 पर्यावरण (संरक्षण) कायदा, 1986 याबरोबर नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, 2000 प्रमाणे निर्देश-भांडवली खर्चामधुन 25% तरतुद नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी करणे आवश्यक असल्यामुळे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन 2014-2015 च्या अर्थसंकल्पामध्ये भांडवली खर्चामधुन 25% तरतुद नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 85 :**

आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो.लक्ष्मणचावडी ते एमजीएम, जयभिमनगर घाटी ते मकाई गेट, फुलेनगर, उस्मानपुरा व किराडपुरा शहर विकास योजना आराखडानुसार शहराच्या विकासाच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचे असल्याने व विविध कारणाने रस्ता रूंदीकरणामध्ये ज्या मिळकत धारकांच्या मिळकती रस्ता रूंदीकरणामध्ये गेलेले आहेत.

तसेच विविध कारणाने आपदग्रस्त मिळकत धारकांना शासनाकडून महानगरपालिका हस्तांतरीत झालेल्या जमीनीवर मौजे हर्सुल सर्वे नं. 216 मध्ये महानगरपालिकेने रेखांकन करून त्यांना भुखंड देण्यात आलेले आहे. त्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दि.18/02/2012 विषय क्र.606 अन्वये ठराव मंजुर करण्यात आलेला आहे.

त्यासाठी नाममात्र भाडे प्रतीवर्ष 100/- प्रमाणे भुखंड वाटप पत्र (Allotement Letter) देण्यात आले आहे. त्याबाबतचा करारनामा व करानाम्यानुसार नाममात्र भाडे प्रतिवर्ष रू.100/- प्रमाणे तीस वर्षाच्या मुदतीवर भुखंड वाटप करणेसाठी झालेल्या प्रशासकीय मान्यतान्वये मा.स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेस अधिन राहुन भुखंड वाटप करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने सर्व भुखंड धारकांकडून वैयक्तीक करारनामा करणे असल्याने या कार्यवाहीस मा.स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असल्याने त्या मान्यतेसह यानुसार यापुढे सर्व भुखंड धारक लाभार्थी यांचेशी करारनामा करण्यात येईल.

करारनामा करण्याच्या कार्यवाहीचे व मंजुरीचे सर्व अधिकार मा.आयुक्त,महानगरपालिका यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

श्री.त्र्यंबक तुपे :कैलासनगर ते एमजीएम मागे जाणा-या रस्त्यातील काही मिळकत धारकांना प्लॉट मोबदला दिला व 26 लोकांची यादी माझ्याकडे आहे त्यांना दिलेले नाही. यांनी सुध्दा रस्त्यासाठी जागा दिली आहे.किती लोकांना दिले किती बाकी आहे.किती मालमत्ता भुसंपादीत केलल्या होत्या.मोबदला प्लॉट दिल्यानंतर तेथे पुन्हा दुकाने, घरे, ओटे केले असे अतिक्रमण होऊ नये.लक्षमण चावडी रस्त्यामध्ये 8-9 नवबौध्द लोकांची घरे गेली त्यांना 2 लक्ष देण्याचे कबूल केले होते ती रक्कम दिली का? शिवाय ओबीसी, खुल्या वर्गातील लोकांना 70-75 हजार देणार होते. त्यातील रक्कम कमी करून 35-40 हजार देण्याचे सांगण्यात येते या बाबत सविस्तर खुलासा करावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :ज्याच्या जागा रस्ता रूंदीकरणामध्ये गेलेल्या होत्या काहींना पर्यायी जागा दिली मोबदला दिला मकईगेट, किराडपुरा असेल किंवा इतर रस्त्यामध्ये बांधीत जागेचा मोबदला जे लाभार्थी आहे त्यांची यादी तयार करून सर्व सस्यांना देण्यात यावी.आलेला प्रस्ताव उशीर आलेला आहे त्यास मंजूरी दयावी.

कार्य.अभियंता(इ वफ) :सर्वे नंबर 216,217 मध्ये रमाई आवास योजने अंतर्गत घरे बांधली आहे.ज्याची घरे पडली रस्त्यामध्ये आलेली आहे त्याची यादी ही नगररचना विभागामार्फत झाली. या लोकांना अलॉटमेंन्ट लेटर नगररचना विभाग मार्फत देण्यात आले.यात अनु.जाती व नवबौध्द जे होते त्यांना रमाई आवास योजनेमध्ये समावेश केला 2 लक्ष देण्यात आले.या व्यतिरिक्त जे जनरल वर्गामध्ये येतात त्यांना 75 हजार देण्याचे मंजूर आहे त्यापैकी त्यांना 40 हजार दिले उर्वरीत पैसे काम पुर्ण झाल्यानंतर देणार आहोत.

श्री.काशिनाथ कोकाटे :खुल्या संवर्गातील लोक आहे त्यांना पुर्ण 75 हजार देण्यात यावे त्यांना घराचे काम पुर्ण करता येइल.

कार्य.अभियंता :23 लोकांना 75 हजार देणार आहोत ज्यांना 40 हजार दिले अनेकांनी घरे बांधली नाही.

श्री.काशिनाथ कोकाटै : पुर्ण रक्कम देऊन टाकावी.सर्वसाधारण सभेने ठराव घेतला आहे

श्री.त्र्यंबक तुपे :30 वर्षाच्या लिजवर प्लॉट दिले जे 26 लोक बाकी आहे त्यांना देण्यात यावे.

कार्य.अभियंता(इ व फ) :याची यादी सहा.संचालक नगररचना विभागाकडे आहे यादी मागवून घेण्यात येईल.

श्री.त्र्यंबक तुपे :26 लोकांना लाभ मिळाला नाही आणखी किती लोक आहे यादी मागवावी सर्व तपासणी करून जे राहिले असतील त्यांना मोबदला मिळावा.

कार्य.आीीयंता(इ फ ) :लक्षमण चावडी, बारापुल्ला गेट , घाटी रस्त्यावरील लोक यात आहे घरे पाडतांना टाईम लिमीट दिले होते. तेथे सर्वे केला यादी अंतिम झाली आहे

मालमत्ता अधिकारी :283 लोकांची यादी सादर झाली होती प्लॉट वाटप केले.प्लॉटची संख्या 320 आहे.

मा.सभापती :ज्या लोकांची घरे जागा रस्ता रूंदीकरणामध्ये गेली आहे त्यातील किती लोकांना लाभ दिला किती बाकी आहे सर्व यादी सभागृहासमोर सादर करावी.तसेच जेथे लॉट देण्यात आले तेथील नागरीकांना पिण्याचे पाण्याची व लाईटची व्यवस्था करावी. विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.लक्ष्मणचावडी ते एमजीएम, जयभिमनगर घाटी ते मकाई गेट, फुलेनगर, उस्मानपुरा व किराडपुरा शहर विकास योजना आराखड्यानुसार रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत मिळकतधारकांना नाममात्र भाडे प्रतिवर्ष रू.100/- प्रमाणे आकारून तीस वर्षाच्या मुदतीवर मौजे हर्सुल सर्वे नंबर 216 मध्ये महानगरपालिकेने रेखांकन करून भुखंड वाटपाच्या केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. तसेच संबंधीतांशी करारनामा करण्याच्या कार्यवाहीचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. विकास योजना आराखड्यानुसार रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत मिळकतधारकांचे पुनर्वसन करण्यात येत असल्याने भुखंड धारकांकडून रू.200/- च्या मुद्रांकावर नोंदणीकृत नोटरी करारनामा करून घेण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 86 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड (क) अंतर्गत वार्ड क्र.28 तसेच वार्ड क्र.42 रोशन गेट मकसूद कॉलनी येथील विविध ठिकाणी डांबरीकरण करण्याचे शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्षका अंतर्गत सन 2013-14 नुसार अंदाजपत्रक सादर करण्यात आले असता, रक्कम रूपये 44,89,095/- सादर करण्यात आले असता, सदरील अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

करीता वार्ड क्र.28 व वार्ड क्र.42 येथील विविध ठिकाणी डांबरीकरण करण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 44,89,095/- मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड (क) अंतर्गत वार्ड क्र.28 तसेच वार्ड क्र.42 रोशन गेट मकसूद कॉलनी येथील विविध ठिकाणी डांबरीकरण करण्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 44,89,095/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 87 :**

प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.80 संतोषीमाता नगर येथील नाल्यावर पुल बांधणे बाबत (मस्जिद जवळ) (अ.प.रक्कम रू.3418706) या कामाचा अंदाजपत्रक दिनांक 08/08/2014 रोजी संपन्न झालेला मा.स्थायी समिती सभेत विषय क्र.46 नुसार अ.प.रक्कम 3418706/- ला मंजुरी मिळालेली आहे. या कामासाठी निविदा मागविण्यात आले असता खालीलप्रमाणे भरलेले निविदा प्राप्त झाल्या. निविदा व निविदा दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|
| 01 | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | 0.10 % कमी दराने |
| 02 | श्री.अब्दुल कदीर शेख रहीम | 2.99 % जास्त दराने |
| 03 | मे.अमन असोसीएटस | 42.23 % जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10 % कमी दराने आहेत.

तरी मे.एल.के. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10% कमी दराची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.मीर हिदायत अली :हा गुंठेवारी भाग आहे परंतु यापुर्वी आरेफ कॉलनी,आसेफ बाग ई भागातील लोकांनी 20-20 वर्षापुर्वी बेटरमेन्ट चार्जेस भरणा केले तेथे पाणीपुरवठा,ड्रेनेज लाईनची कामे होत नाही. या प्रस्तावानुसार त्या भागातील वसुली किती आहे.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.80 संतोषीमाता नगर येथील नाल्यावर पुल बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.10 % कमी दराची मे.एल.के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 88 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.44 किराडपुरा येथील किराडपुरा चौक ते पाणी का बंबा नाल्यापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे या कामाकरीता सा.बां. विभागाच्या सन 2013-14 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.2945005/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील कामाचा खर्च सन 2014-15 अंतर्गत विकास योजने अंतर्गत विविध विकास कामे करणे या लेखाशिर्षातुन उपलब्ध तरतुदी नुसार करण्यांत येईल.

करीता उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.2945005/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

मा.सभापती :ऐनवेळचे विषय दुरूस्तीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.44 किराडपुरा येथील किराडपुरा चौक ते पाणी का बंबा नाल्यापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.2945005/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 89 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यापुर्वी मा.स्थायी समिती सभेचा ठराव क्र.04 दिनांक 03/07/2014 रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेत आस्थापना विभागास दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेच्या दैनिक वेतनावरील वर्ग-4 कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-2/ 1515/2014, दिनांक 04/08/2014 रोजीच्या आदेशान्वये दिनांक 31/10/2014 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापना वरील वर्ग-4 संवर्गातील खालील कर्मचारी कार्यरत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव (सर्वश्री/श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती.मंदाबाई तुकाराम दांडगे | **दै.वे.सेविका** | महिला व बालकल्याण कक्ष | रु.340/- |
| 2 | दिपक शेषराव दाभाडे | **दै.वे.सेवक** | मा.उपआयुक्त (म) दालन | रु.340/- |
| 3 | रविंद्र प्रभाकर देवकर | **दै.वे.वॉचमन** | मालमत्ता विभाग | रु.340/- |
| 4 | स.शहाबुद्यीन स.जकरूद्यीन | **दै.वे.वॉचमन** | मालमत्ता विभाग | रु.340/- |
| 5 | रमेश सखाराम जाधव | **दै.वे.वॉचमन** | मालमत्ता विभाग | रु.340/- |
| 6 | रविंद्र विठ्ठल कांबळे | **दै.वे.सेवक** | वाचनालय | 340/- |
| 7 | रमेश दत्तु देवडे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 8 | विनोद पांडूरंग तुपे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.340/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | सुधाकर आसाराम त्रिंभुवन | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 10 | गोविंद कृष्णराव साळवे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 11 | संजय विठ्ठल इंगळे | **दै.वे.सेवक** | कर आकरणी विभाग | रु.340/- |
| 12 | समिंदर रमेश | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 13 | प्रल्हाद गुंजाळे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 14 | कडूबा औताडे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 15 | मिलिंद दत्तोपंत आम्ले | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 16 | सिध्दार्थ पांडूरंग दांडगे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 17 | सतिश सोमाजी गडवे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 18 | सर्जेराव शिंदे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 19 | सुभाष निलकंठ | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 20 | रामेश्वर फुलारे | **दै.वे.सेवक** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 21 | कमलबाई शिवन्ना गुडम | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 22 | कमलबाई भिमराव साळवे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 23 | रंजना तुळशीराम मोरे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 24 | लताबाई कारभारी घाटे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 25 | शहनाज बेगम रशिद खॉं | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 26 | इंदुबाई पांडूरंग दांडगे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 27 | इंदुबाई राजुरे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 28 | मंगलाबाई मिश्राम | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 29 | चंद्रकला शंकर आम्ले | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 30 | उषा सुनिल घोगरे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 31 | संध्या श्याम साळवे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 32 | सुनिता किसन साळवे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 33 | मलेका शाहीन शे.जलील अहेमद | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 34 | यशोधरा नामदेव वसाटे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 35 | विद्या मनोहर शेळवणे | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 36 | छायाबाई अशोक म्हस्के | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 37 | शारदाबाई दलबहादुरसिंग ठाकुर | **दै.वे.सेविका** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 38 | राजेश प्रभाकर पवार | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 39 | चंद्रमणी समाधान गवई | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 40 | रावसाहेब जाधव | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 41 | कुदन काशिनाथ गणोरे | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 42 | मनोज लखनलाल तुळशीबागवाले | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 43 | रविंद्र खापे | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 44 | संदिप सुभाष घाग | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 45 | प्रल्हाद विठ्ठल करडे | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 46 | साहेबराव मुक्ताजी गायकवाड | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 47 | विजय पंडीतराव गायकवाड | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 48 | अय्युब खॉं सांडू खॉं | **दै.वे.चौकीदार** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 49 | रमेश चंद्रय्या परके | **दै.वे.विद्युत लाईनमन** | विद्युत विभाग | रु. 430/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 50 | अण्णासाहेब दाणे | **दै.वे.विद्युत लाईनमन** | उपअभियंता पा.पु | रु. 430/- |
| 51 | कैलास श्रीपत बनकर | **दै.वे.विद्युत लाईनमन** | विद्युत विभाग | रु. 430/- |
| 52 | असलम खान मुकीद खान | **दै.वे.मजूर** | निवडणूक विभाग | रु.340/- |
| 53 | इलियास अ.बसरावी | **दै.वे.मदतनीस** | यांत्रिकी विभाग | रु.340/- |
| 54 | मो.युसुफ़ मो.उस्मान | **दै.वे.मदतनीस** | यांत्रिकी विभाग | रु.340/- |
| 55 | शेख इम्रान शेख फ़जलोद्दीन | **कक्ष सेवक** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 56 | म.गयासोद्दीन सलामोद्दीन | **कक्ष सेवक** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 57 | विमलबाई भुईगड | **सेविका** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 58 | राजेंद्र दिनकर कुंभारीकर | **प्रयोग शाळा सहाय्यक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 59 | सौ.जयश्री वसंत जोशी | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 60 | विलास दत्तू नाईक | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 61 | सुरेश दामोधर नलावडे | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 62 | श्रीमती.जिजाबाई नवगिरे | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 63 | श्रीमती.पार्वता दाडेकर | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 64 | भरत पचलोरे | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 65 | सुभाष दत्तात्रय सुरासे | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 66 | मुंढे भानुदास नरसू | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 67 | कमल कचरु मोरे | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 68 | भोसले पंढरीनाथ देवीदास | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 69 | नारायण शेषराव जंगले | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 70 | वाचा सुंदर संतोष | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 71 | निकम शांताराम नारायण | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 72 | तनवीर खान नियाजी | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 73 | शेख हबीब लाल | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 74 | मनिषा किसनराव पाटील | **दै.वे.नोंदणी लिपीक** | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 75 | फ़िरोज खान गणी खान | **दै.वे.वॉर्डबाय** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 76 | मोहमंद सज्जाद सईद अन्सारी | **दै.वे.वॉर्डबाय** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 77 | परवेश अण्णाजी मिसाळ | **दै.वे.वॉचमन** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 78 | युवराज लांडगे | **दै.वे. सेवक** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 79 | निरु कृष्णा गवळे | **दै.वे. सेवक** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 80 | जाधव सखुबाई शंकर | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 81 | गायकवाड मिना गणपत | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 82 | वाघ सखुबाई आसाराम | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 83 | काळे मिनाबाई काशिनाथ | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 84 | फुले धुरपताबाई सांडू | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 85 | फ़िरंगी लिला नरसिंग | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 86 | कांबळे शोभा साहेबराव | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 87 | के.डब्ल्यु.पोपलवार | **दै.वे. सेविका** | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 88 | विजय गोविंद साबळे | **प्रयोग शाळा सहाय्यक** | आरोग्य विभाग | रु.430/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 89 | दिलीप श्रीधर ठोंबरे | **दै.वे.मजूर** | अग्निशमन विभाग | रु.340/- |
| 90 | बाबासाहेब रंजाजी कांबळे | **दै.वे.हमाल** | वॉर्ड-ब कार्यालय | रु.340/- |
| 91 | राजेश दिपचंद लाहोट | **दै.वे.स्वीपर** | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 92 | किशोर विनायक साबळे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 93 | नदिम अख्तर | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 94 | विष्णू नारायण काळे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 95 | मिर्झा अन्वर बेग | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 96 | फेरोज अहमद मुस्ताफ अ खान | **दै.व.वाचमन** | वार्ड क कार्यालय | 340/- |
| 97 | गणेश साहेबराव उजगरे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ड  कार्यालय | रु.340/- |
| 98 | अनिल येडूबा साळवे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ड कार्यालय | रु.340/- |
| 99 | लताबाई अशोक साळवे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ड कार्यालय | रु.340/- |
| 100 | संजय शामराव ठोबरे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ड कार्यालय | रु.340/- |
| 101 | मोहमंद मुदस्सीर शेख बशीर | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 102 | शेख जावेद शे.जाफर | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 103 | श्रीमती.रमादेवी भगवान म्हस्के | **दै.वे.सेविका** | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 104 | राजु चंद्रभान बढे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 105 | द्वारकाबाई नाना अडागळे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-डकार्यालय | रु.340/- |
| 106 | चतुराबाई भिमराव हतागळे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 107 | रविंद्र शामसुंदर कांबळे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 108 | संजय रतन खरे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 109 | किशोर खुशाल रामटेके | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 110 | अतुल हरीचंद्र  फुलके | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 111 | शोभाबाई दिलीप साळवे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 112 | जाईबाई साहेबराव साळवे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 113 | हौसाबाई रामभाऊ वडमोर | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 114 | मिनाबाई दामोधर सोनवणे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 115 | पुष्पाबाई जानकु त्रिभुवन | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 116 | सावित्रीबाई भगवान मगरे | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 117 | कांताबाई अंबादास पटेकर | **दै.वे.मजूर** | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 118 | विजय लक्ष्मणराव देशपांडे | **वॉचमन** | भारत माता मंदिर (सांस्कुतीक विभाग) | रु.340/- |
| 119 | सुनिल किसनराव दाभाडे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 120 | सतिश केशव बनकर | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 121 | राजेंद्र भागाजी नवगिरे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 122 | मिलींद धनाजी गायकवाड | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 123 | बालसिंग भोपाल कणसे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 124 | रामदास हरिचंद्र बमणे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 125 | किशोर मोतीराम उगळे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 126 | राजेश नाथाजी गवळे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 127 | रावसाहेब हरीभाऊ मगरे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 128 | बाळकृष्ण कचरु भारसाखळे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 129 | सुरेश नामदेव खरात | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 130 | कैलास पांडुरंग वाणी | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 131 | संतोष गोविंद जगे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 132 | वैजिनाथ देवराव साबळे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 133 | सुनिल दौलत अंभोरे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 134 | बाबासाहेब भाऊराव भारसाखळे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 135 | छगन तुळजाराम सलामपूरे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 136 | सुभाष बाबुलाल हरणे | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 137 | बबन पंडीतराव जाधव | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 138 | राधाकिसन फकीरचंद बकले | **दै.वे.वॉचमन** | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 139 | वाजीद खान मन्सूर खान | **गणेश कॉलनी** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 140 | इम्रान उल्ल खान फ़ैल उल्ला | **कैसर कॉलनी** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 141 | फ़ारुख अली तुराब अली | **कैसर कॉलनी** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 142 | एहतेशाम अली हाश्मी | **लोटा कारंजा** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 143 | मिर्झा रुफ़द बेग | **(सेवक) शहा बाजार** | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 144 | सुरेश धाबर्डे | **दै.वे.चौकीदार** | नगरसचिव विभाग (मा.सभापती, स्था.स.) | रु.340/- |

करिता उपरोक्त प्रमाणे एकुण 144 दैनिक वेतनावरील कर्मचा-यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि. 03/11/2014 ते दिनांक 30/04/2015 पर्यंत 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यात येऊन कामावर रुजू करुन घेण्याची मंजुरी देण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-4 संवर्गातील अ.क्र.01 ते 144 (एकुण-144) कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.03/11/2014 ते दिनांक 30/04/2015 पर्यंत 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 90 :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT अंतर्गत समांतर जलवाहिनी योजनेचा प्रकल्प पीपीपी तत्वावर राबविण्यात येत आहे. UIDSSMT योजने अंतर्गत केंद्र शासनाने त्यांच्या अनुज्ञेय अनुदानापैकी 50% रकमेचा पहिला हप्ता रुपये 143.87 कोटी रक्कम दिनांक 03.11.2009 रोजी व राज्य शासनाने त्यांच्या अनुज्ञेय अनुदानापैकी 50% रकमेचा पहिला हप्ता रुपये 17.94 कोटी रक्कम दिनांक 04.05.2011 रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस वितरीत केलेला आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या पीपीपी प्रकल्पासाठी निविदा कार्यवाही होऊन कन्सेशनरची नियुक्ती झालेली आहे. कन्सेशनर सोबत दि.22.08.2011 रोजी कन्सेशन ॲग्रीमेंट झालेले आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने पाणी पुरवठा योजना दि.01.09.2014 या Appionted Date रोजी कन्सेशनरकडे पुढील कार्यवाहीसाठी हस्तांतरीत केलेली आहे. कन्सेशन ॲग्रीमेंट मधील तरतुदींनुसार कन्सेशनर यांचेमार्फत कार्यवाही सुरु झालेली आहे.

समांतर जलवाहिनीचा पीपीपी प्रकल्प राबवितांना या प्रकरणी वेळोवेळी कन्सेशनर यांचे सोबत होणाऱ्या बैठका, शासन स्तरावरील बैठका, प्रकल्प राबवितांना कन्सेशन ॲग्रीमेंट मधील तरतुदीनुसार

वेळोवेळी Financial / Legal मुद्दे उपस्थित होणार आहेत. कन्सेशनर यांच्याकडुन वेळोवेळी होणारा पत्र व्यवहार व महानगरपालिकेकडुन त्यांना कन्सेशन अॅग्रीमेंटच्या तरतुदीनुसार द्यावयाची उत्तरे, शासन पत्र व्यवहार, केंद्र व राज्य शासनास प्रत्येक तिमाहीला सादर करावयाचा त्रैमासीक अहवाल, या प्रकल्पाशी संबंधीत लेखा परीक्षण संदर्भाने प्राप्त होणारे आक्षेप व त्यांना द्यावयाची उत्तरे या सर्व कामांसाठी त्या त्या क्षेत्रातील तज्ञ / अनुभवी व्यक्ती असणे आवश्यक आहे. महानगरपालिकेकडे अशा प्रकारचे काम करण्याची क्षमता असणारे कर्मचारी / अधिकारी नाहीत.

समांतर जलवाहिनी प्रकल्पासाठी कन्सेशनर मार्फत वकिल /C.A. तसेच या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती नेमलेल्या असून त्यांचेमार्फत महानगरपालिकेसोबत पत्र व्यवहार तसेच बैठकांमध्ये सहभाग घेतला जातो. सदर बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दयांना महानगरपालिकेतर्फे देखील समर्पक आणि कायदेशिरपणे उत्तरे देणे आवश्यक आहे. अशा स्थितीमध्ये औरंगाबाद महानगरपालिकेचे भविष्यात कोणतेही आर्थिक नुकसान होऊ नये या दृष्टीकोनातून कॉर्पोरेट क्षेत्रामध्ये काम करीत असलेले वित्त व कायदे विषयक तज्ञ यांची नेमणूक महानगरपालिकेमार्फत करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या पीपीपी प्रकल्पासाठी Transaction Advisor म्हणून निविदा कार्यवाही करून Concessionaire ची नियुक्ती होईपर्यंत क्रिसील संस्थेने काम केले आहे. यावेळी क्रिसील संस्थेतर्फे श्री सेतू दिवेकर हे Team Leader म्हणून काम करीत होते. निविदा कार्यवाही व कन्सेशन अॅग्रीमेंटची कार्यवाही पूर्णपणे श्री सेतू दिवेकर यांनी केली आहे. त्यामुळे ते या प्रकल्पातील प्रत्येक बाबीशी संबंधीत चांगल्या प्रकारे परिचित आहेत. सध्या श्री सेतू दिवेकर यांनी क्रिसील संस्था सोडली असून त्यांनी त्यांची स्वतःची सल्लागार संस्था सुरु केली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेचा पीपीपी प्रकल्प पूर्णपणे त्यांनी हाताळलेला असल्यामुळे त्यांच्या सेवेचा / अनुभवाचा महानगरपालिकेस निश्चितपणे फायदा होऊ शकतो. श्री सेतु दिवेकर यांनी त्यांच्या अनुभवाची माहिती महानगरपालिकेस सादर केलेली असून त्यांना खालील क्षेत्रामध्ये (वित्तीय क्षेत्र) अनुभव आहे. या क्षेत्रामध्ये त्यांना भारतातील तसेच विदेशातील दक्षिण-पुर्व एशियन देश जसे, व्हिएतनाम, इंडोनेशिया येथे प्रत्यक्ष केलेल्या कामाचा अनुभव आहे.

- Public-Private Partnership Projects as Bid/ Transaction Advisor;
- Financial Expert / Advisor for various PPP /Infrastructure Projects;
- Government policies;
- Institutional development; and
- Capacity building for Government client in PPP

समांतर जलवाहिनी प्रकल्पा संदर्भाने श्री. सेतु दिवेकर यांनी खालीलप्रमाणे कामे करण्याबाबत सहमती दर्शविली आहे.

अ) Project Implementation Assistance (प्रकल्प राबविण्यासाठी सहाय्य)

1. Assessment of the relevant documents and communication between AMC and the Concessionaire, and State / Central Government; and
2. Providing assistance to AMC in dealing commercial / contractual aspects with the Concessionaire, and State / Central Government.

ब) Reforms Implementation Monitoring (सुधारणांची अंमलबजावणी करण्यासाठी मदत)

अनिवार्य सुधारणा व ऐच्छिक सुधारणांची अंमलबजावणी करणे शासनाने महानगरपालिकेस बंधनकारक केलेले आहे. अनिवार्य सुधारणांतर्गत ई-प्रशासन, दुहेरी लेखा नोंद पध्दत, मालमत्ता कर, सेवा कर, शहरी गरीबांना सेवा पुरविण्याकरीता निधी उभारण्याची अंतर्गत तरतुद, शहरी गरीबांसाठी मुलभुत सेवा पुरविणे आणि ऐच्छिक सुधारणांतर्गत प्रशासकिय सुधारणा व संरचनात्मक सुधारणांचा समावेश आहे.

क) घनकचरा व्यवस्थापन संबंधी निविदा तयार करणेसाठी Transaction Advisor म्हणून काम करणे.

सदर प्रकल्प पीपीपी तत्वावर राबविण्यासाठी खालीलप्रमाणे कामे करण्याबाबत श्री सेतू दिवेकर यांनी सहमती दर्शविली आहे. सदर पीपीपी प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया राबवून महानगरपालिकेतर्फे पीपीपी ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आली तर अशा परिस्थितीमध्ये Success Fee म्हणून संबंधीतांना (श्री सेतू दिवेकर यांना) शुल्क द्यावे लागेल. सदर Success Fee ची रक्कम महानगरपालिका व संबंधीत सल्लागार निविदा कार्यवाही दरम्यान आप-आपसात चर्चा करुन ठरवतील. ही Success Fee पीपीपी ऑपरेटर कडून वसुल करण्यात येईल. त्याचा आर्थिक बोजा महानगरपालिकेवर लगेचच येणार नाही. Transaction Advisor म्हणून श्री सेतू दिवेकर यांनी खालील कामे करण्यास सहमती दिली आहे.

1. To determine the structuring of the Project, in consultation with AMC;
2. Preparation of the RFP Volume-I (Instruction to Bidders), and RFP Volume-II (Concession Agreement)
3. Preparation of RFP Volume III (Project Information Memorandum), based on inputs from AMC
4. Preparation and Issuance of the Tender Notice;
5. Pre-Bid Meeting and preparation of replies to the pre-bid queries
6. Receipt and opening of the bids from bidders;
7. Assessment of the bids, preparation of the bid assessment report for AMC;
8. Issuance of the LOI/LOA to the Selected Bidder;
9. Assistance to AMC in negotiation with the Selected Bidder; and
10. Assistance to AMC in signing of the Agreement with Selected Bidder

वरीलप्रमाणे समांतर जलवाहिनी पीपीपी प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून काम करीत असतांना महानगरपालिकेस कायदे विषयक बाबींसाठी सहाय्य आवश्यक असल्यास सदर काम श्री. सेतु दिवेकर करण्यास तयार आहेत.

उपरोक्त प्रमाणे सर्व कामे करण्याबाबत श्री सेतू दिवेकर यांनी तयारी दर्शविलेली आहे. उक्त कामे करण्यासाठी रुपये 1,50,000/- अधिक सर्विस टॅक्स प्रति महिना अशी सल्लागार फी मागीतलेली आहे. या संदर्भाने दिनांक 05.12.2014 रोजी श्री सेतू दिवेकर यांचेशी त्यांनी मागितलेली फी कमी करणेबाबत त्यांचेशी वाटाघाटी संदर्भाने प्रत्यक्ष चर्चा केली असता त्यांनी उक्त कामे वर नमूद दरापेक्षा कमी रकमेत करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. त्यामुळे रुपये 1,50,000/- अधिक सेवा कर मान्य करुन तशी शिफारस मान्यतेस्तव स्थायी समितीपुढे करण्यात येत आहे.

श्री.सेतु दिवेकर यांचा या क्षेत्रातील अनुभव पाहता तसेच महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारचे काम करण्याचा अनुभव असणारे अधिकारी नसल्यामुळे संबंधीतांना महानगरपालिकेतील सदर Project Implementation Assistance & Reforms Implementation Monitoring ची कामे समांतर जलवाहिनी प्रकल्पाच्या Construction & Rehabilitation Period दरम्यान (तीन वर्षांसाठी) रुपये 1,50,000/- अधिक सर्विस टॅक्स प्रति महिना या दराने देण्याबाबत विचार होणे योग्य राहील. या दराने वार्षीक रुपये 18,00,000/- अधिक सर्विस टॅक्स एवढा खर्च होईल. त्यास मान्यता होणेकरीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सेतु दिवेकर यांचा या क्षेत्रातील अनुभव पाहता तसेच महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारचे काम करण्याचा अनुभव असणारे अधिकारी नसल्यामुळे संबंधीतांकडून

महानगरपालिकेतील समांतर जलवाहीनी प्रकल्पा संदर्भाने Project Implementation Assistance & Reforms Implementation Monitoring ची कामे समांतर जलवाहिनी प्रकल्पाच्या Construction & Rehabilitation Period दरम्यान (तीन वर्षांसाठी) रुपये 1,50,000/- अधिक सर्विस टॅक्स प्रति महिना या दराने करून घेण्यास मंजुरी देण्यांत येते. याकरीता वार्षीक रुपये 18,00,000/- अधिक सर्विस टॅक्स एवढ्या खर्चासह मंजुरी देण्यांत येते. याचसोबत प्रस्तावातील नमुद बाब क्र. क.- घनकचरा व्यवस्थापन संबंधी निविदा तयार करणेसाठी Transaction Advisor म्हणून श्री.सेतु दिवेकर यांचेकडून सदर काम प्रस्तावातील नमुद अटी व शर्तीनुसार करून घेण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 91 :**

उपआयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपाचे यांत्रिकी विभागासाठी खाजगी वाहन चालक आवश्यकता असल्यामुळे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे खाजगी एजन्सी मार्फत खाजगी वाहन चालक पुरविण्यात आले होते.सदरील वाहन चालकांचे काम महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स या कंपनीला देण्यात आले आहे. सदरील वाहन चालकांचे दर प्रति महिन्याला 8582/-+सर्व्हीसचार्जेस 10%+सर्व्हीस टॅक्सेस शासनाचे नियमाप्रमाणे तसेच PF व ESI हे वेगळे राहील (प्रति महिना प्रति वाहन चालक) दि.01/07/2014 ते 31/12/2014 पर्यंत एजन्सीला कार्योत्तर मंजुरीसाठी मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार वरीलप्रमाणे एजन्सीला कार्योत्तर मंजुरी देऊन पुढील सहा महिन्यासाठी वाहन चालक मनपाला पुरविण्याच्या परवानगीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : प्रस्तावास दुरूस्तीसह मंजुरी देण्यांत येते. संबंधीताने एक वर्षाकरीता काम करण्यास समंती दर्शविल्याप्रमाणे मान्यता देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, यांत्रिकी विभागासाठी वाहन चालक पुरविण्याचे काम महाराणा सेक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स यांचेकडून शासनाचे नियमाप्रमाणे रूपये 8582/- + सर्व्हीस चार्जेस 10% + सर्व्हीस टॅक्सेस तसेच PF व ESI हे वेगळे (प्रति महिना प्रति वाहन चालक) या दराने दिनांक 1/7/2014 ते 31/12/2014 पर्यंत करून घेतलेले असल्याने त्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. तसेच सदर एजन्सीला पुढील एक वर्षासाठी वाहन चालक पुरविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 92 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 456 दिनांक 16/01/2014 च्या मंजुरीन्वये टि.व्ही. सेंटर एन 10 सिडको येथील खेळाचे मैदानाकरीता आरक्षित जागेवर स्टेडीयम विकसीत करणेचे काम रितसर प्रशासकीय मंजुरी तसेच सक्षम समितीच्या मंजुरी अंती सुरू करण्यात आलेले आहे.

सदरील स्टेडीयम अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या एकुण 52 दुकानांपैकी एकुण 50 दुकाने रूपये 10.00 लक्ष आधारभुत किमंतीसह दिनांक 01/02/2014 च्या जाहीर सूचनेनुसार 30 वर्षासाठी भाडेपट्ट्याने देण्याकरीता शहरातील नागरीकांकडून रितसर विहीत अर्ज मागविण्यात आलेले होते.

एकुण 50 दुकानांपैकी मागासवर्गीयांसाठी 3 दुकाने, अंध व अपंगासाठी 1 दुकाने, महिला वर्गासाठी 15 दुकाने तसेच उर्वरीत 31 दुकाने ही खुल्या वर्गासाठी ठेवण्यात आलेली होती.

शहरातील नागरीकांनी सदरील प्रकल्पास अत्यंत चांगला प्रतिसाद दिलेला होता नागरीकांनी दिलेल्या ऑफरनुसार महानगरपालिकेस रूपये 12,55,84,770/- कोटीचा महसूल प्राप्त होणार असुन सर्व 50 दुकानांचे वाटप निवड समितीच्या शिफारसीनुसार करण्यात आलेले होते. वाटप करण्यात आलेल्या दुकानां अंतर्गत सर्वोच्च ऑफर म्हणुन रूपये 47,000,00.00 लक्ष तसेच कमीत कमी ऑफर म्हणुन रूपये 21,21,111/- लक्षची ऑफर सदरील दुकानां अंतर्गत प्राप्त झालेली होती.

प्रकल्पाची कार्यवाही सुरू असतांना अस्तित्वातील स्टेडीयमच्या भिंतीला उत्तर बाजुने जुने झुनका भाकर केंद्र करीता बांधकाम करण्यात आलेले होते. सदरील बांधकाम हे सौ.शंकुतला सोनार यांचे होते. सदरील प्रकल्प अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या दुकानामध्ये दुकान देणे बाबत सौ.शंकुतला सोनार यांनी मा.उच्च न्यायालयात मनपा व सिडको विरूध्द याचिका क्रमांक 10/2014 दाखल करून प्रकल्पातील दुकान त्यांनी दाखल केलेल्या ऑफर रक्कमेत देण्याबाबत विनंती केलेली होती.

प्रकरणात महानगरपालिकेने मा.न्यायालयाकडून प्राप्त नोटीसच्या अनुषंगाने महानगरपालिकेची सक्षमरित्या बाजु मांडलेली होती. प्रकल्पाचे काम सुरू असल्याने तसेच महानगरपालिकेचा महत्वाकांक्षी प्रकल्प असल्याने कोणत्याही प्रकारची वैधानिक अडचण निर्माण होऊ नये म्हणुन तत्कालीन मा.आयुक्त महोदय यांनी दिनांक 02/09/2014 अन्वये एक विशेष बाब म्हणुन सौ.शंकुतला सोनार यांचे सोबत प्रत्यक्ष चर्चेनुसार प्रकल्पातील रिक्त झालेले दुकान क्रमांक 50 जे की महिला वर्गासाठी आरक्षित आहे. ते दुकान महानगरपालिकेस सदर प्रकल्प अंतर्गत कमीत कमी ऑफर म्हणुन जी रक्कम प्राप्त आहे. म्हणजेच रूपये 21,21,111/- लक्ष मध्ये दिनांक 01/02/2014 च्या जाहीर सूचने मधील तसेच विहित मार्गदर्शक पुस्तिकेतील अटी व शर्तीनुसार 30 वर्षासाठी भाडेपट्ट्याने देण्यास तसेच महानगरपालिकेस भरणा करावयाच्या एकुण रक्कमेपैकी 25 टक्के रक्कम दुकानाचा ताबा घेण्यापुर्वी तसेच उर्वरीत 75 टक्के रक्कम समान हप्त्यात 5 वर्षात भरणा करण्यास मंजुरी दिलेली आहे.

करीता औरंगाबाद महानगरपालिकेचा महत्वाकांक्षी प्रकल्प विहीत कालावधीत पुर्ण होणेच्या दृष्टीकोनातून एक विशेष बाब म्हणुन प्रकल्पातील दुकान क्रमांक 50 हे सौ.शंकुतला सोनार यांना दिनांक 01/02/2014 च्या जाहीर सूचनेमधील व विहित मार्गदर्शक पुस्तिकेतील अटी व शर्तीनुसार तसेच महानगरपालिकेस भरणा करावयाच्या एकुण रक्कम रूपये 21,21,111/- लक्ष पैकी 25 टक्के रक्कम दुकानाचा ताबा घेण्यापुर्वी तसेच उर्वरीत 75 टक्के रक्कम समान हप्त्यात 5 वर्षात भरणा करण्यासह 30 वर्षासाठी विहीत अटी व शर्तीसह भाडेपट्ट्याने देणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती च्या अवलोकनास्तव तसेच मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टि.व्ही. सेंटर एन 10 सिडको येथील खेळाचे मैदानाकरीता आरक्षित असलेल्या जागेवर स्टेडीयम विकसीत करणेचे काम रितसर प्रशासकीय मंजुरी तसेच सक्षम समितीच्या मंजुरी अंती सुरू करण्यात आलेले होते. सदरील स्टेडीयम अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या एकुण 52 दुकानांपैकी एकुण 50 दुकाने रूपये 10.00 लक्ष आधारभुत किमंतीसह दिनांक 01/02/2014 च्या जाहीर सूचनेनुसार 30 वर्षासाठी भाडेपट्ट्याने देण्याकरीता शहरातील नागरीकांकडून रितसर विहीत अर्ज मागविण्यात आलेले होते. प्रकल्पाची कार्यवाही सुरू असतांना अस्तित्वातील स्टेडीयमच्या भिंतीला उत्तर बाजुने जुने झुनका भाकर केंद्र करीता बांधकाम करण्यात आलेले होते. सदरील बांधकाम हे सौ.शंकुतला सोनार यांचे होते. सदरील प्रकल्प अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या दुकानामध्ये दुकान देणे बाबत सौ.शंकुतला सोनार यांनी मा.उच्च न्यायालयात मनपा व सिडको विरूध्द याचिका क्रमांक 10/2014 दाखल करून प्रकल्पातील दुकान त्यांनी दाखल केलेल्या ऑफर रक्कमेत देण्याबाबत विनंती केलेली होती. करीता औरंगाबाद महानगरपालिकेचा महत्वाकांक्षी प्रकल्प विहीत कालावधीत पुर्ण होणेच्या दृष्टीकोनातून एक विशेष बाब म्हणुन प्रकल्पातील दुकान क्रमांक 50 हे सौ.शंकुतला सोनार यांना दिनांक 01/02/2014 च्या जाहीर सूचनेमधील व विहित मार्गदर्शक पुस्तिकेतील अटी व शर्तीनुसार तसेच महानगरपालिकेस भरणा करावयाच्या एकुण रक्कम रूपये 21,21,111/- लक्ष पैकी 25 टक्के रक्कम दुकानाचा ताबा घेण्यापुर्वी तसेच उर्वरीत 75 टक्के रक्कम समान हप्त्यात 5 वर्षात भरणा करण्यासह 30 वर्षासाठी विहीत अटी व शर्तीसह भाडेपट्ट्याने देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 93 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.25 सिडको एन-7 येथील सेक्टर सी ते म्हाडा-आर-28, म्हाडा-जी-1, आणि सेक्टर सी-1 व इतर रस्त्याचे मजबुतीकरण व पुनर्डांबरीकरण करणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2011-2012 च्या दरसुचीनुसार र.रू.26,23,400/- चे अंदाजपत्रकास मान्यता होऊन कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकुण (3) तीन निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|
| 01 | मे.अरोरा कन्स्ट्रक्शन | 2.12 % अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| 02 | मे.एम.ए.सिद्दीकी | 4 % अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने |
| 03 | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | 6.86 % अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने |

करीता वरील प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांची असुन, ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.12% कमी दराची आहे. त्यास दिनांक 26/11/2014 चे मान्यतेनुसार मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

तथापी मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांची उपरोक्त कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.12 % कमी दराची निविदा मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.25 सिडको एन-7 येथील सेक्टर सी ते म्हाडा-आर-28, म्हाडा-जी-1, आणि सेक्टर सी-1 व इतर रस्त्याचे मजबुतीकरण व पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.12% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**(महबूबखॉ पठाण)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद